गुड मॉर्निंग
लोकशाही वार्ता
चंद्रपूर
नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/९

## कुजलेल्या स्थितीत आढळला मृतदेह

**समुद्रपूर :** तालुक्यातील शेडगाव शिवारात कुजलेल्या अवस्थेत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. २९ रोजी शेडेगाव शिवारात ईस्माईल समडोये यांच्या शेताजवळ एका व्यक्तीचा मृतदेह मिळून आला.

पोलिस पाटील यांनी याबाबत समुद्रपूर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला.

## ट्रकसमोर उडी घेत व्यक्तीची आत्महत्या

**समुद्रपूर :** नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील जाम येथे जमदापूर येथील व्यक्तीने कारमधून उतरून ट्रकच्या समोर उडी घेतल्याने त्याचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. ही घटना ३० रोजी ११.३० वाजताच्या सुमारास घडली. श्रीनिवास नर्सिंग्लू सुकनाल (वय ३५) रा. जमदापूर जि. अदिलाबाद असे मृताचे नाव आहे. श्रीनिवास हा त्याच्या कुटुंबासह टीजी.०१, ८००९ क्रमांकाच्या कारने प्रयागराज ते आदिलाबाद जाम मार्गे जात असतात हिंगणघाट रोड येथे आल्यावर लघुशंका करण्याच्या निमित्ताने कारखाली उतरून त्याने हैदराबादकडे जाणाऱ्या ट्रकसमोर उडी मारली. अपघातात त्याचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# वेकोलिच्या कार्यक्षेत्रात स्थानिकांना रोजगार द्या

## हंसराज अहीर यांची चंद्रपूर-बल्लारपूर वेकोलि महाव्यवस्थापकांशी चर्चा

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

वेकोलिच्या क्षेत्रात बेरोजगारांना तातडीने रोजगार उपलब्ध करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ८०:२० धोरणाचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी क्षेत्रीय महाव्यवस्थापक व संबधित अधिकाऱ्यांना दिले.

स्थानिक सुशिक्षित व व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या प्रकल्प प्रभावित व परिसरातील बेरोजगार युवकांना वेकोलि कार्यक्षेत्रात ओबी उत्खनन प्रयोजनार्थ कार्यरत कपन्यांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या ८०:२० या धोरणानुसार रोजगार उपलब्ध करण्याकरिता व वेकोलि प्रकल्पग्रस्त तसेच अन्य प्रलंबित प्रश्नांच्या निवारणा संदर्भात राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी चंद्रपूर व बल्लारपूर वेकोलि क्षेत्राचे मुख्य महाव्यवस्थापक व अन्य संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन नुकतीच अनेक विषयावर चर्चा केली.

बैठकीमध्ये हंसराज अहीर यांनी वेकोलिच्या दोन्ही क्षेत्रात कार्यरत असलेल्या ओबी उत्खनन कंपनीमध्ये स्थानिक बेरोजगार युवकांना रोजगार देण्यासंदर्भात भेदभाव व अन्याय केला जात असल्याचे निदर्शनास आले.



त्यामुळे या कंपनीमध्ये अधिकाधिक स्थानिक बेरोजगार युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सामावून घेण्याचे धोरण स्वीकारून ठेकेदारी तत्वांवर रोजगार देण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या ८०:२० धोरणाचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश क्षेत्रीय महाव्यवस्थापक व संबधित अधिकाऱ्यांना दिले. ओबी उत्खनन कंपनीचे व्यवस्थापन शासनाच्या निर्णयाची अवहेलना करीत असल्याबाबत खेद व्यक्त करीत वेकोलि व्यवस्थापनाने स्थानिकांच्या रोजगाराविषयी कंपनीला बाध्य करतानाच या बेरोजगारांना तातडीने रोजगार उपलब्ध करण्याची सूचना केली. वेकोलि क्षेत्रीय कार्यक्षेत्रात नव्याने येणाऱ्या अशा सर्व कंपन्यांमध्ये कार्य करण्यासाठी ऑपरेटर, ड्रायव्हर, सुपरवायझर, हेल्पर या सर्व पदाची भरती स्थानिकांना शासन निर्णयाच्या धर्तीवरच विशेष प्राधान्य देत तसेच एच.पी.सी. नुसार वेतन देण्याचे आणि वेकोलि द्वारा सी.एस.आर. अंतर्गत वैद्यकीय सुविधा देण्याचे निर्देश सुद्धा हंसराज अहीर यांनी या बैठकीत दिले. सोबतच बल्लारपूर क्षेत्रातील प्रस्तावित जमीन अधिग्रहण प्रकल्प व त्यातील अन्य समस्यांबाबत सुद्धा अहीर यांनी यावेळी चर्चा केली.

## अर्थसंकल्पावर मान्यवरांची प्रतिक्रिया

### सर्वसमावेशक व विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीकडे नेणारा अर्थसंकल्प - हंसराज अहीर

**चंद्रपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारचा आठवा केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत सादर केला. हा अर्थसंकल्प २०४७ मधील विकसित भारताची 'ब्ल्यू प्रिंट' असून, गरीब, युवाशक्ती, शेतकरी, महिलाशक्ती व मागासवर्गीय घटकांना समर्पित, ऐतिहासिक व देशाच्या विकासाला नव्या उंचीवर नेणारा असल्याचे राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी म्हटले आहे. या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, स्टार्टअप, शिक्षण, आरोग्य, स्वयंरोजगार व रोजगारासह अन्य महत्वूपर्ण क्षेत्रात पायाभूत सुविधांना दृष्टीपथात ठेवून देशाच्या विकासाला भरीव आर्थिक तरतुदीतून नवी दिशा देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. १.७० कोटी शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना, नोकरदार करदात्यांना रु.१२.७५ लाखावर आयकर मुक्ती, टॅक्स रिटर्न फाईलकरिता ४ वर्षांची मुदत, कॅन्सर उपचारात सुट व औषधे आयात करमुक्त, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख केल्याने ७ कोटींहून अधिक शेतकरी, मच्छिमारांना दिलासा, दुर्मिळ व गंभीर आजारांवरील ३६ औषधे कस्टम ड्युटीमुक्त, जमीन नोंदी आधुनिकीकरण, ज्येष्ठ नागरिकांची टिडीएस मर्यादेत १ लाखपर्यंत वृद्धी, पुढील ३ वर्षांत जिल्हा रुग्णालयात डे केयर कॅन्सर सेंटरची स्थापना, वैद्यकीय शिक्षणात १० हजार जागांची वाढ, कापूस उत्पादकांसाठी ५ वर्षांच्या योजनेसह अनेक लोकाभिमुख, विकासाभिमुख योजना कार्यान्वित करून देशाला समृद्ध व विकसित राष्ट्राकडे नेणारा हा अर्थसंकल्प असल्याचे हंसराज अहीर यांनी म्हटले आहे.

### भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी ठोस निर्णयांचा अर्थसंकल्प - आ. जोरगेवार

**चंद्रपूर :** केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ हा आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासावर भर देणारा आहे. मध्यमवर्गीय नागरिक, शेतकरी, उद्योजक आणि तरुणांना प्रोत्साहन देणाऱ्या योजनांचा यात समावेश असून भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी ठोस निर्णयांचा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया आ. किशोर जोरगेवार यांनी दिली आहे. गरीब, तरुण, महिला आणि शेतकरी यांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले आहे. धनधान्य योजना, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि आधुनिक शेतीला चालना मिळेल. महत्त्वाच्या ३६ औषधांवरील कस्टम ड्यूटी हटविण्यात आल्याने औषधे स्वस्त होतील. हा अर्थसंकल्प भारतीय अर्थव्यवस्थेला बळकट करणारा आहे.

### आश्वासनांची खैरात आणि निराशादायक अर्थसंकल्प - खा. धानोरकर

**चंद्रपूर :** केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ घोषणांचा समावेश आहे. जनसामान्यांसाठी तसेच तरुण, महिला, शेतकरी व शेतमजूर यांच्यासाठी या अर्थसंकल्पातून काहीच साध्य झाले नसल्याची खंत खा. प्रतिभा धानोरकर यांनी या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केली.

### हा अर्थसंकल्प सर्व समाजघटकांना दिलासा देणारा - डॉ. गुलवाडे

**चंद्रपूर :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य सुविधांच्या मजबुतीकरणावर भर देण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना दिलासा देण्यासाठी आयकर सवलती देण्यात आल्या आहेत. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा ८ लक्षावरून १२ लक्षापर्यंत वाढविण्यात आली आहे, ज्यामुळे मध्यमवर्गीयांच्या खर्च करण्याच्या क्षमतेत वाढ होईल. यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीला गती मिळेल.

### जनसामान्यांची फसवणूक करणारा अर्थसंकल्प : दिनेश चोखारे

चंद्रपूर : अर्थसंकल्पामध्ये वाढत्या महागाईबद्दल तरतूद नाही. शेतीविषय धोरणांसंदर्भात कुठल्याही प्रकारची आकडेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. अर्थमंत्र्यांनी हमी भाव मिळण्याचा कायदा याबाबत काहीच केले नाही. आजही राज्यात दररोज ७ शेतकरी आत्महत्या करतायत. सादर झालेला अर्थसंकल्प हा जनसामान्यांची फसवणूक करणारा आहे. या अर्थसंकल्पात बेरोजगार युवक, शेतकरी, जनसामान्यांकरीता कुठलेही स्थान नसल्याचे दिसून येत आहे, असे जिल्हा काँग्रेस कमिटी, चंद्रपूरचे उपाध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे यांनी म्हटले आहे.

## मिनी ट्रॅक्टर व उपसाधने पुरवठा योजनेत बदल

### अर्थसहाय्य बँक खात्यात जमा होणार

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटाना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवणे या योजनेत आमूलाग्र बदल करण्यात आला आहे. यापुढे या योजनेअंतर्गत लाभार्थी बचत गटाला देण्यात येणारे (अर्थसहाय्य) हे वस्तू स्वरुपात न देता मंजूर अर्थसहाय्याची रक्कम ३.१५ लाख रुपये बचत गटाच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

योजनेच्या अर्टी व शर्तीनुसार स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य महाराष्ट्राचा रहिवासी असावा, बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य तसेच बचत गटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत. बचत गटाचे राष्ट्रीयकृत बँकेत बचत गटाच्या नावे बँक खाते असावे व सदरचे बँक खाते बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांचे आधार क्रमांकाशी संलग्न असावे. स्वयंसहाय्यता बचत गटाने खरेदी केलेला मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ही भारतने निर्धारित केल्यानुसार फार्म, मशिनरी, ट्रेनिंग आणि टेस्टींग इन्स्टीट्यूट यांनी टेस्ट करून जाहीर केलेल्या उत्पादकांच्या यादीतील परिमाणानुसार असावेत. पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांना शासनाने त्या-त्या जिल्ह्यासाठी निश्चित करून दिलेल्या उद्दिष्टांनुसार अर्थसहाय्य मंजूर करून त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. योजनेच्या लाभासाठी निवड झालेल्या स्वयंसहाय्यता बचत गटाला त्यांनी खरेदी केलेले मिनी ट्रॅक्टर चालविण्याचे अधिकृत संस्थेकडून प्रशिक्षण घेणे व त्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

स्वयंसहाय्यता बचत गटाने खरेदी केलेले मिनी ट्रॅक्टर उपसाधने अर्थसहाय्य घेतल्यानंतर सदर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने विकता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही. तशा आशयाचे हमीपत्र स्वयंसहाय्यता बचत गटाला द्यावे लागेल. तसेच प्रत्येक वर्षी १० वर्षांपर्यंत त्याबाबत प्रमाणपत्रास मंजूरी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक असेल. ज्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी पॉवर ट्रिलर किंवा मिनी ट्रॅक्टर योजनेचा लाभ घेतला आहे, त्या बचत गटांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

## गणेशजयंती शोभायात्रेचे भाजपतर्फे स्वागत

### सहभागी गणेशभक्तांना शीतपेयाचे वाटप

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

गणेश जयंतीनिमित्त नव बाल साईनाथ गणेश मंडळाच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. भारतीय जनता पार्टीतर्फे आ. किशोर जोरगेवार यांच्या कार्यालयासमोर शोभायात्रेचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. तसेच शोभायात्रेत सहभागी गणेश भक्तांना शीतपेयाचे वाटपही करण्यात आले. यावेळी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.



दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेश जयंतीनिमित्त नव बाल साईनाथ गणेश मंडळच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

विठ्ठल मंदिर येथील गणपती मंदिर येथून निघालेली ही शोभायात्रा शहराच्या मुख्य मार्गाने निघून जटपूरा गेटला वळसा घालून पुन्हा गणेश मंदिर येथे दाखल झाली. त्यानंतर गणपती मंदिराला वळसा घालून शोभायात्रेचा समारोप करण्यात आला. शोभायात्रेत गणेशभक्त मोठ्या संख्येत सहभागी झाले होते.

## आयडीबीआय बँक सावलीतर्फे जि.प. शाळांना जलशुद्धीकरण यंत्र भेट

**लोकशाही वार्ता/सावली**



शिक्षण आणि रोजगारवर्धित व्यवसाय कौशल्यासह शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार हे उद्देश समोर ठेऊन आय. डी. बी. आय. बँक शाखा सावलीच्या वतीने सीएसआर फंडातून जिल्हा परिषद शाळा सावली, बोथली हिरापूर, विरखल व निफंद्रा येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून प्रत्येकी एक जल शुद्धीकरण संच देण्यात आला. सदर निधी आयडीबीआय बँकेचे क्षेत्रीय अधिकारी वर्धा क्षेत्र नवीव यादव यांच्या सहकार्यातून उपलब्ध करून देण्यात आला. यावेळी सावली आयडीबीआय बँक शाखाप्रमुख प्रवीण शंभरकर, उपशाखा प्रमुख निखिलेश पानतावणे, व्यवसाय प्रतिनिधी राहुल लोडेलीवार, रोशन मराठे, मोतीराम नागापुरे, मुख्याधापक आदरलावर, मुख्याधापिका मोहुर्ले, मुख्याधापक दुर्गे प्रामुख्याने उपस्थित होते.

## मोफत विधी सेवा व सहाय्याबाबत मिळणार माहिती

### अ विधी सेवा व सहाय्य माहिती फलकाचे अनावरण

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयामार्फत मोफत विधी सेवा व सहाय्याबाबत माहिती देणाऱ्या फलकाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच सर्व नागरिकांना माहिती सहज उपलब्ध व्हावी, या हेतूने तयार करण्यात आलेल्या माहिती पत्रिकेचे देखील अनावरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश पी.जी. भोसले, जिल्हा न्यायाधीश ईशरत शेख, दिवाणी न्यायाधीश प्रवीण शिंदे, मुख्य न्यायदंडाधिकारी शेखर गोडसे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, जिल्हा सरकारी वकील पी.जी. घट्टवार तसेच चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष, सर्व न्यायाधीश, वकील आणि न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते. भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३९ प्रमाणे समाजातील गरीब व दुर्बल घटकांना मोफत विधी सहाय्य पुरवण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. याप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर आणि सर्व तालुका विधी सेवा समितीमार्फत मोफत विधी सेवा सहाय्य दिले जाते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म म्हणाल्या, मोफत विधी सेवेबाबत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना माहिती व जनजागृती व्हावी या उद्देशाने, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत जिल्ह्यातील ८२५ ग्रामपंचायत कार्यालयात सदर सेवेविषयीची माहिती बॅनर्स आणि पॉम्प्लेट स्वरूपात पुरविली जाणार आहे. त्याचे अनावरण देखील जिल्हा व सत्र न्यायालयात करण्यात आले आहे. २०२५ या वर्षात आयोजित केल्या जाणाऱ्या लोक अदालतीच्या तारखांबाबतची माहिती, भांडण, तडजोड याबाबत मध्यस्थांची भूमिका आणि सर्वसामान्य नागरिकास टोल-फ्री क्रमांक १५१०० द्वारे मोफत विधी सल्ला मिळू शकतो, याबाबतची माहिती दिली जाणार आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी म्हणाले.

## विद्यार्थ्यांना त्वरित भोजन भत्ता द्यावा, अन्यथा आंदोलन

### ओबीसी सेवा संघाचा सरकारला इशारा

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले; मात्र वसतिगृहात शासनाची मेस नसल्याने त्यांना बाहेर जेवण करावे लागते. यासाठी भोजनभत्ता म्हणून दर महिन्यात ४ हजार ५०० रुपये, तसेच विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता ६०० रुपये, तर विद्यार्थिनींना ८०० रुपये भत्ता 'डीबीटी'द्वारे देण्याची तरतूद आहे. मात्र, मागील पाच महिन्यांपासून विद्यार्थ्यांना भोजन भत्ता व निर्वाह भत्ता मिळाला नाही. विद्यार्थ्यांना त्वरित भोजन भत्ता द्यावा, अन्यथा ४ फेब्रुवारीला आंदोलन करण्याचा इशारा ओबीसी सेवा संघाने सरकारला दिला आहे.

शिष्टमंडळात ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. अनिल डहाके, जिल्हा महासाचिव ॲड. विलास माथनकर, भाविक येरगुडे, प्रलय म्हशाखेत्री, साहिल चांदेकर आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना त्वरित भोजन भत्ता व निर्वाह भत्ता (डीबीटी)द्वारे द्यावा. ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज केले आहे. त्यांची निवड यादी लावावी. कनिष्ठ महाविद्यालय, स्नातकोत्तर, पॉलिटेक्निक, एएनएमला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश द्यावा, आदी मागण्या करण्यात आल्या. विद्यार्थ्यांचा भत्ता मिळावा, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नागपूर, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली. या निवेदनामध्ये ४ फेब्रुवारीला आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## चंद्रपुरात जिल्हास्तरीय पशू-पक्षी प्रदर्शन व सरस महोत्सव

### जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाचे आयोजन

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनी व सरस महोत्सव चांदा क्लब ग्राऊंड येथे आयोजित करण्यात आला आहे.

तीन दिवसीय या पशुपक्षी प्रदर्शनीमध्ये जातीवंत गाय वर्गातील देवणी, डांगी, खिल्लार, लाल कंधारी, गवळावू, कठाणी तसेच भारतीय गोवंशाच्या गीर, थारपारकर या देशी गायी/वळू तसेच विदेशी जातीच्या संकरीत एच.एफ. व संकरीत जर्सी गायी/वळू, त्याचप्रमाणे म्हैस वर्गात नागपुरी, जाफ्राबादी, पंढरपुरी, मुऱ्हा जातीच्या म्हशी/रेडा, शेळी गटात तोतापारी, उस्मानाबादी, बेरारी, बिटल, काठियावाडी/कच्छी, बारबेरी, आफ्रिकन बोएर जातीच्या शेळ्या/बोकड, मेंढी गटात दख्खनी मेंढी, कुक्कुट व कुक्कुटादी पक्षीगटात कडकनाथ, कावेरी, सातपुडा, असील, सोनारी, गावरान जातीचे कुक्कुट पक्षी व खाकी कॅम्पबेल बदक सहभागी होणार आहेत. सदर पशुप्रदर्शनात शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती, संशोधित पशुसंवर्धन तंत्रज्ञान, बाजारपेठ व्यवस्थापन तसेच विविध पशुवैद्यकीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, पशुपालकांनी पशुप्रदर्शनीचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी केले आहे.

## चांदा पब्लिक स्कूल येथे 'ग्रॅण्ड पॅरेंट्स डे'चे आयोजन

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

चांदा पब्लिक स्कूल येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध दंततज्ज्ञ डॉ. सुशील मुंधडा यांनी हजेरी लावली होती. यावेळी बालरोगतज्ज्ञ डॉ. राजीव देवईकर, शाळेच्या संचालिका स्मिता जीवतोडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका आम्रपाली पडोळे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वजारोहन करून राष्ट्रगीता समवेत सलामी देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी 'तेरा हिमालय आकाश छूले' हे देशभक्तीपर व 'दया करना...' हे प्रार्थनागीत सादर केले. सोबतच विविध खेळांचे नयनरम्य प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेत विद्यार्थ्यांच्या आजी-आजोंबाकरिता विविध खेळांचे व



स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आतापर्यत खेळापासून दूर असणाऱ्या आजी-आजोबांनी खेळांचा मनमुराद आनंद लुटला. आम्ही पुन्हा एकदा बालपणात परतलो, आमच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला, असे वक्तव्य त्यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथींनी उपक्रमाचे कौतुक करीत जीवनाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आजी-आजोबांचा मुलांच्या आयुष्यात फार मोलाचे स्थान आहे. तेव्हा अशा नवनवीन उपक्रम व खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रूजवणूक करून आजी-आजोबा व नातवंडामधील नाते अधिक दृढ होईल, असे वक्तव्य केले. शाळेच्या संचालिका स्मिता जिवतोडे व प्राचार्या आम्रपाली पडोळे यांनी उपस्थित सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थ्यांसह निलीमा पाऊणकर, मेघा शुक्ला तर आभार अवंतिका बेहार या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख शुभांगी वाकडे, रेश्मा शेख, पर्यवेक्षक महेश गौरकार, फहीम शेख, झेबा जाकिर अंसारी, वंदना बोरसरे, स्मृती मून, शिल्पा खांडरे तसेच विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## तलाठ्याला मारहाण

**भंडारा:** अवैध रेती वाहतुकप्रकरणी कारवाई करताना तलाठ्याला थापडबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना पवनी तालुक्यातील भावड येथे घडली. संतोष गाडेले हे तलाठी भावड येथे रेती तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करीत असताना आरोपी मच्छिंद्र भूरे (२६) व प्रकाश वंजारी (२८) दोन्ही रा. जुनोना यांनी तलाठ्यांना थापडबुक्क्यांनी मारहाण केली व तीनही रेतीचे ट्रॅक्टर पळवून नेले. याप्रकरणी आरोपींविरुद्ध अड्याळ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून तपास पोलिस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत.




लोकशाही वार्ता
# भंडारा
नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/१०

## मासळ येथे शंकरपटाचे आयोजन

**लाखांदूर :** तालुक्यातील मासळ येथे २ फेब्रवारी रोजी दुपारी १२ वाजता शंकरपटाचे उद्घाटन करण्यात येईल. यावेळी बैलांच्या ईनामी शंकरपटाचे सत्कारमूर्ती म्हणून महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार नाना पटोले, भंडारा विधानसभेचे आमदार नरेंद्र भोंडेकर, उद्घाटक म्हणून खासदार प्रशांत पडोळे, विधान परिषद आमदार परिणय फुके, उपाध्यक्ष म्हणून माजी खासदार सुनिल मेंढे, डॉ. सोमदत्त करंजेकर, जिल्हा परिषद सदस्य लता नरूले, अविनाश ब्राम्हणकर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे प्रामुख्याने उपस्थित राहतील. ६ फेब्रुवारीपर्यंत इनामी शंकरपट चालणार आहे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### दृष्टिक्षेप



## अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई

**लोकशाही वार्ता / सिहोरा**

सिहोरा ठाण्याचे ठाणेदार विजय कसोधन हे गस्तीवर असताना अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या एलपी ट्रकवर कारवाई केली. पोलिसांनी केलेल्या कारवाईत ४० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैधरित्या रेती वाहतूक करणारा ट्रक क्र.एम.एच. ४०/सी.डी. ३६२७ या ट्रकला थांबवून चालक अंकित यादव याला रॉयल्टीबाबत विचारपूस केली असता चालकाने मध्यप्रदेशातील ईटीपी परवाना सादर केला. सदर ट्रकमध्ये मध्यप्रदेशातून अवैधरित्या रेती भरून महाराष्ट्रात वाहतूक करताना आढळून आला. महाराष्ट्र राज्यातील रेती वाहतूक परवाना सादर न केल्याने सदर ट्रकवर जप्तीची कारवाई करण्यात आली. सदर कारवाई ठाणेदार विजय कसोधन, राजू साठवणे, तिलक चौधरी, छबीलाल शरणागत आदींनी केली आहे. पोलिसांनी ट्रकचालकविरुद्ध सिहोरा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेची आत्महत्या

**भंडारा:** पोटाच्या त्रासामुळे विषारी औषध प्राशन करून महिलेने आत्महत्या केली. ही घटना लाखनी पोलिस ठाण्यांतर्गत राजेगाव एमआयडीसी येथे घडली. तेजस्विनी शिशुपाल मेश्राम (२९) असे मृत विवाहित महिलेचे नाव आहे. लाखनी पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे.

## निधन वार्ता

### ताराबाई नंदरधने



**पवनी :** येथील ताराबाई दशरथ नंदरधने (९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यापश्चात पाच मुले, पाच मुली, नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवर आहे. त्यांच्या पार्थिवावर २ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता वैजेश्वर मोक्षधाम पवनी येथे अंत्यसंस्कार होईल.

### इंदिरा भिवगडे



**भंडारा:** राजस्व कॉलनी, गणेशपूर येथील इंदिराताई रमेश भिवगडे यांचे १ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्यामागे बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# स्फोटातील जखमींकडे आयुध निर्माणीचे दुर्लक्ष

## आश्वासनांचे पालन नाही: कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष

**लोकशाही वार्ता/भंडारा**

जवाहरनगर येथील आयुध निर्माणीत २४ जानेवारी रोजी झालेल्या भीषण स्फोटात ८ कर्मचाऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले, तर ५ कर्मचारी रुग्णालयात उपचार घेत आहेत. हा स्फोट नेमका कसा झाला, याचा शोध घेण्यासाठी तीन चौकशी समित्या स्थापन करण्यात आल्या. दरम्यान, मृतक आणि जखमींच्या कुटुंबीयांना दिलेल्या आश्वासनांची अद्यापही पूर्तता करण्यात न आल्याने कामगारांमध्ये असंतोष आहे.



२४ जानेवारी रोजी झालेल्या स्फोटानंतर इमारतीमध्ये दबले गेलेल्या कर्मचाऱ्यांचे बचावकार्य रात्री उशिरापर्यंत सुरू होते. या घटनेत एकूण ८ कर्मचारी मृत्युमुखी पडले तर ५ कर्मचारी गंभीर जखमी झाले.

२५ जानेवारी रोजी मृत कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी सर्व मृतदेह कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर ठेवून आंदोलन केले. या आंदोलनाला लोकप्रतिनिधींचीही जोड मिळाली. कंपनी प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये झालेल्या चर्चेअंती मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना ५० लाखांचे अर्थसहाय्य तात्काळ देण्यात येईल व उर्वरित ५० लाखांच्या अर्थसहाय्यासाठी केंद्र सरकारसोबत पाठपुरावा केला जाईल, असे ठरले होते. त्यानुसार ५० लाखाचे धनादेश कुटुंबीयांकडे स्वाधीन करण्यात आले. परंतु, उर्वरित ५० लाख रुपयांच्या अर्थसहाय्यासाठी कंपनीकडून कोणतीही हालचाल होत नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. या स्फोटात जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना ५ लाख रुपये देण्याचेही ठरले होते. परंतु, यावरही कंपनीकडून पाठपुरावा सुरू नसल्याची माहिती आहे. या व अशा काही कारणांमुळे कर्मचाऱ्यांनी अद्यापही कामबंद आंदोलन सुरूच ठेवले आहे. तर कंपनी प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांवर काम सुरू करण्यासाठी दबाव आणला जात आहे.

शुक्रवारी काही कर्मचाऱ्यांनी स्वच्छता आणि साफसफाईला सुरूवात केली. त्यामुळे सोमवारपासून कंपनीचे कामकाज सुरू होण्याची शक्यता आहे.

# युनिव्हर्सल मॅग्निज कारखाना दोन दशकांपासून बंद

## कारखान्याची दुर्दशा; तीन हजार कामगार झाले बेरोजगार

**लोकशाही वार्ता/तुमसर**

तालुक्यातील माडगी येथील युनिव्हर्सल (खंबाटा) फेरो मॅग्निज शुद्धिकरण करणारा कारखाना गत १९ वर्षापासून बंद आहे. सदर कारखाना त्वरीत सुरू करण्यात यावा किंवा कारखान्यासाठी संपादित शेतकऱ्यांची ३०० एकर सुपिक जमीन त्यांना परत करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे करण्यात आली आहे.

तुमसर तालुक्यातील माडगी युनिव्हर्सल (खंबाटा) फेरो मॅग्निज शुद्धीकरण करणारा कारखाना बंद असल्याने ३००० कामगार बेरोजगार झाले आहेत. या कारखान्यासाठी माडगी शिवारातील शेतकऱ्यांनी आपल्या सुपिक जमिनी दिल्या होत्या. ३०० एकरात हा कारखाना उभारला गेला. अभय योजनेंतर्गत कारखान्याला १५० कोटी वीजबिल माफ करून सवलती देण्यात आल्या आहे. परंतु त्यानंतरही हा कारखाना सुरु झाला नाही. ३५ वर्ष हा कारखाना सुरु होता. १८ ऑगस्ट २००६ पासून कारखाना कायमचा बंद आहे. या कारखान्यावर सुमारे २०० कोटींचे वीज बिल थकित होते.

यापूर्वी एनटीपीसी येथे सवलतीच्या दरात कारखान्याला वीज पुरवठा करीत होती. सवलतीच्या दरात वीज पुरवठा बंद केल्याने गुंता वाढला होता. वीज वितरण कंपनीने सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यास नकार दिला होता. कारखान्याकडे सुरुवातीला ५० कोटी रुपये थकीत होते. पुढे ती रक्कम वाढून २०० कोटी रुपयांपर्यंत गेली होती. दरम्यान कारखानदाराने १८ आगस्ट २००६ मध्ये क्लोजर करण्याचा निर्णय घेतला. २७८ कामगारांना क्लोजरची माहिती दिली.

कारखाना सुरु राहावा यासाठी आतापर्यंत जिल्ह्यातील अनेक राजकीय पक्षाच्यावतीने प्रयत्न करण्यात आले. परंतु त्यात यश आले नाही. मात्र प्रशासकीय यंत्रणेत खळबळ उडली होती. राज्य शासनाने आजारी कारखान्यासाठी अभय योजना सुरु केली. त्यानुसार युनिव्हर्सल (खंबाटा) फेरोने २०१४ मध्ये अभय योजनेत समावेश करण्यात आला होता. त्यामुळे कारखान्यावरील वीज बिल अर्धे माफ करण्यात आले. कारखानदाराने २०० कोटींपैकी ४८ कोटी रुपयांचे देयक भरले. केवळ कारखाना सुरु करण्याच्या अटीवर अभय योजनेचा लाभ मिळेल, असा करारनामा करण्यात आला होता. कारखाना सुरु करण्यासाठी तीन वर्षाची मुदत देण्यात आली होती.

२०१७ मध्ये तीन वर्षे लोटले तरीसुध्दा कारखानदाराने कारखाना सुरु केला नाही. कारखानदाराने कराराचा भंग केला आहे. कारखान्याकडे ३०० एकर सुपिक जमीन पडून आहे. कारखानदाराने कारखाना सुरु करावे, अन्यथा स्थानिक शेतकऱ्यांच्या त्या जमीनी परत कराव्यात, अशी मागणी स्वराज्य युवा एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित मेश्राम यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांना केली आहे.

# घर कर भरूनही कराची मागणी

## ढिवरवाडा ग्रामपंचायतचा प्रताप

**लोकशाही वार्ता/मोहाडी**

तालुक्याच्या शेवटच्या टोकावर जंगलव्याप्त परिसरात असलेले १ हजार ५०० लोकवस्तीचे ढिवरवाडा हे गाव. या गावातील करदाते जगदीश लोंदासे यांनी मे २०२४ मध्ये संपूर्ण कर भरून सुद्धा त्यांना पुन्हा कराची मागणी करण्यात आली आहे. असा भोंगळ कारभार ढिवरवाडा ग्रामपंचायतमध्ये सुरू आहे.

मोहाडी तालुका वैनगंगा नदीमुळे दोन भागात विभागला गेला आहे. नदीच्या पलीकडे पूर्व दिशेस करडी परिसर. दक्षिण दिशेस जंगलव्याप्त शेवटच्या टोकावर ढिवरवाडा हे गाव आहे. जगदीश लोंदासे हे ढिवरवाडा येथील रहिवासी असून यांनी सन २०२४ साली कर मागणी बिलानुसार ३ मे २०२४ मध्ये १८३३ रुपये घर कर व ९६० रुपये पाणी कर भरून दिले. तरीपण दि.२९ ऑगस्ट २४ रोजी ५ हजार ६७३ रुपये कर थकीत दाखविले आहे. हा प्रकार गंभीर असून अनेक ग्रामपंचायत मध्ये अशिक्षित गरीब भोळ्या जनतेस लुबाळल्या जात आहे. त्यांनी दिलेले पैसे बोगस पावतीवर खतवील्या तर जात नाही ना? बोगस पावत्यांच्या सुद्धा वापर होतो व करदात्यावर थकीत रक्कम दाखविली जाते हा प्रकार ग्रामपंचायत देव्हाडा (बुज) येथे बघण्यास मिळतो. सदर ग्रामपंचायतीचे सचिव सोनवणे यांच्याशी संपर्क करून वरील प्रकरणाबाबत चौकशी केली असता असा प्रकार घडलाच नाही असे बोलले.

या प्रकरणाची गंभीर चौकशी करून पिडीताला न्याय द्यावा सदर प्रकरणाची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी,खंड विकास अधिकारी पंचायत समिती मोहाडी यांना देण्यात आली आहे.

# रेशीम उद्योगाच्या विकासाला गती देणार - पालकमंत्री सावकारे

**लोकशाही वार्ता/भंडारा**

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांनी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यात भंडारा सिल्क उद्योग प्रा. लि., कान्हलगाव (ता. मोहाडी) आणि रेशीम मूलभूत सुविधा केंद्र, जमनी येथे भेट देऊन ऑटोमॅटिक रेलिंग युनिट आणि टसर व तुती रेशीम उद्योग केंद्राची पाहणी केली.



यावेळी पालकमंत्र्यांनी रेशीम शेती उद्योगाच्या वाढीसाठी विविध उपाययोजना, उत्पादन प्रक्रियेसंबंधी माहिती आणि भविष्यातील संधी याविषयी अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. 'रेशीम शेती ग्रामीण भागातील आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. हा उद्योग कृषी संलग्न असून, अल्पकालावधीत अधिक नफा मिळवून देणारा आणि रोजगार निर्मितीस चालना देणारा आहे', असे त्यांनी सांगितले.

भारतात रेशीम धाग्याची मागणी मोठी असली तरी उत्पादन अपुरे असल्याने मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर भर देण्याची गरज असल्याचे पालकमंत्र्यांनी नमूद केले. सध्या महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमध्ये तुती रेशीम उद्योग कार्यरत आहे, तर टसर रेशीम उद्योग पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात पारंपरिक पद्धतीने चालतो. यामुळे आदिवासी भागातील शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्नाचा उत्तम पर्याय उपलब्ध होत आहे.

यावेळी आमदार कारेमोरे, भंडारा सिल्क उद्योगाचे संचालक खेमचंद सोनकुसरे, पोलिस निरीक्षक सुरेंद्र बेलखेडे, उपविभागीय अधिकारी बालपांडे, प्रभारी तहसीलदार एस. वाय. चांदेवार तसेच विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्र्यांनी रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी आवश्यक मदत, शासनाच्या विविध योजनांचा लाभ आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीबाबत सकारात्मक धोरण राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## जि.प. प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन



**सिहोरा:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवरीदेव येथे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी किशोर रहांगडाले, जिल्हा परिषद सभापती रमेश पारधी, उमेश तुरकर, रंगमंचपुजक विनोद पटले, सचिन पटले सरपंच, राजेश अंबुले, विष्णुदास गौतम, कैलाश पटले, शिशुला पारधी, उमेश्वरी भैरम, गंगाबाई ठाकरे, अनिता वाहने, धर्मेंद्र पटले, प्रिया मनोज पारधी, वैशाली विनोद पटले, गणेश नागोसे, बानाजी कटरे, मुलचंद पारधी, दिलीप पटले, प्रितीलाल पटले, देवदास कटरे, खुशाल रीनाईत, रामदायाल कटरे, मनोज पारधी, परमानंद भैरम, इशुलाल पारधी, राधेश्याम राणे, नंदोकिशोर पारधी, बि. डी. शिंदे, कलाकार मेश्राम, श्रीकांत मेश्राम, इश्र्वरदयाल रिनाईत, प्रमोद पटले, अर्जुन कुर्वे, रविंद्र भगत, सुवरणा मेश्राम, शालिक उके,नरेंद्र पारधी, आनंदराव भगत, दीपमाला रहांगडाले, ललित अंबुले, लंकेश्वरी पारधी, ममता पटले, प्रा.रेणुका अंबुले, मुख्याध्यापक आर. डी.बोपचे, शिक्षक आर. व्ही.संभे, निशा रीनाईत उपस्थित होते. विध्यार्थ्यांना बक्षिस वितरण सरपंच सचिन पटले यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन रामदास बोपचे सर तर आभारप्रदर्शन राजेश संभे यांनी केले.

## संजय गांधी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन



**सिहोरा :** येथील संजय गांधी पूर्व माध्यमिक शाळेत सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य सुषमा पारधी, माजी सभापती कलाम शेख, उपसभापती सुभाष बोरकर, सरपंच रंजना तुरकर, संस्थाध्यक्ष खुमनलाल चौधरी, उपाध्यक्ष रामदयाल पारधी, उपसरपंच सलाम शेख, पत्रकार धीरज गजभिये, सामाजिक कार्यकर्ता गजानन निनावे, सेवानिवृत्त शिक्षक प्राचार्य बी.एस. तुरकर, ग्रा.पं. सदस्य प्रतिक घोडीचोर, गजानन अंबुले, विजय बांडेबुचे, पपिकांत मोरे, मुख्याध्यापक असद शेख उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक असद शेख, शिक्षक संजय कामथे, सेवकराम शरणागत, पुरणलाल पटले, रमेश पारधी, शोभा गायधने, भुवनकला चौधरी, दुर्गा गजाम, हेमा निखारे, सुनीता पडोळे, रजनी हेडाऊ, सोनाली डोहळे, पूर्निशा नागदेवे, निशा कटनकार, निखिल गजबे यांनी सहकार्य केले. संचालन शिक्षक संजय कामथे यांनी केले तर आभार रमेश पारधी यांनी मानले.

## मिरेगाव येथे चितळाला जीवदान



**लाखनी:** मिरेगाव येथे पहाटेच्या सुमारास चितळ शौचालयाच्या टाकीत पडल्याची माहिती बीटरक्षक मुरमाडी तुपकर यांना मिळाली असता घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तेव्हा चितळ १२ फुट खोल टाकीत पडलेला दिसून आला. त्यानंतर चितळाचे बचावकार्य सुरू झाले. एका तासाच्या अथक परिश्रमानंतर चितळाला बाहेर काढण्यात आले. त्यानंतर गावाला लागून असलेल्या जंगलात चितळाला निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले. ही कामगिरी लाखनीचे वनपरिक्षेत्र अधिकारी गोखले यांच्या मार्गदर्शनात आरआरटी टीम भंडारा सदस्य नितीन उशीर, बालाजी कदम, अश्विनी रंगारी, यादव लांजेवार व गावकरी यांचे सहकार्याने पार पडली.

# भंडारा जिल्ह्याच्या २३७ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी

**लोकशाही वार्ता/भंडारा**

भंडारा जिल्ह्याच्या सन २०२५-२६ या वर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या २३७ कोटीच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिली. वस्त्रोद्योगमंत्री मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली.

बैठकीला जिल्हा परिषद अध्यक्ष कविता उईके, आमदार नाना पटोले, आमदार परिणय फुके, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार राजू कारेमोरे, आमदार अभिजित वंजारी, जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, पोलिस अधीक्षक नुरुल हसन उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सर्वसाधारण योजनेकरिता २४६ कोटी, अनुसुचित जाती उपयोजना करिता ५३ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय या योजनांकरिता १०.७६ कोटी असे एकूण रुपये ३०९.७६ कोटी नियतव्यय अर्थसंकल्पित आहे. मंजूर असलेल्या नियतव्ययापैकी सर्वसाधारण योजनेकरिता ९८.४० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना करिता १७.४९ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय या योजनांकरिता ४.४९ कोटी असे एकूण १२०.३८ कोटी निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली प्राप्त झालेला आहे.

२०२४-२५ च्या प्राप्त तरतुदीपैकी सर्वसाधारण योजनेअंतर्गत ७७.९५ कोटी, अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत ११.७४ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य या योजनाअंतर्गत ३.२४ कोटी असे एकूण ९२.९३ कोटी कार्यवाही यंत्रणांना वितरीत करण्यात आलेला आहे. वितरीत तरतुदीपैकी सर्वसाधारण योजनेअंतर्गत ६१.९४ कोटी, अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत १०.९१ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य या योजनाअंतर्गत २.२५ कोटी असे एकूण ७५.०९ कोटी निधी खर्च झालेला आहे. वितरीत तरतुदीशी खर्चाची टक्केवारी ८०.८१ टक्के एवढी आहे.

शासनाने आर्थिक मर्यादा घालून दिली आहे. तर विविध विभागाने ६४० कोटीची मागणी केली आहे. मंत्रालयस्तरावर वित्त व नियोजन मंत्र्यांच्या मार्गदर्शनात राज्यस्तरीय बैठक होईल. त्यामध्ये शासनाने घातलेली मर्यादा व प्रत्यक्ष मागणी यावरून जिल्ह्याचा नियोजनाचा आराखडा ठरणार आहे. या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील यंत्रणेने प्रस्तावित केलेल्या मागणीप्रमाणे निधी मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्रश्नाविषयी जिल्हाधिकाऱ्यांनी अधिनस्त यंत्रणांची बैठक घेऊन गतिमान पध्दतीने शंभर दिवसाचा कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी, असे पालकमंत्र्यांनी निर्देशित केले.

## अर्थसंकल्प प्रतिक्रीया

### आयकर स्लॅबमध्ये बदल भरभक्कम दिलासा देणारा



आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून आयकर स्लॅबमध्ये अनुकूल बदल करण्याचा प्रस्ताव वित्त मंत्री निर्मला सीतारमन यांनी फायनान्स बिल २०२५ मध्ये प्रस्तावित केले आहे. आयकर स्लॅबमध्ये मोठा बदल स्तुतीयोग्य असून २४ लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या करदात्याला फायदेशीर ठरणारा व १२ लाखपर्यंत उत्पन्न असणाऱ्या करदात्याला आयकरमध्ये १०० टक्के सुट मिळणार आहे. नवीन आयकर प्रणालीसाठी बिल आणण्याची घोषणा करण्यात आलेली असून भविष्यात आयकर प्रणालीमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत.

**- सीए पंकज मुंधडा**

### दिशाहीन अर्थसंकल्प



केंद्रीय अर्थसंकल्प दिशाहीन, गोंधळात टाकणारे आणि सर्वसामान्यांसाठी निराशाजनक आहे. हा अर्थसंकल्प पूर्णपणे भांडवलदार आणि कॉर्पोरेट जगताच्या फायद्यासाठी बनविण्यात आला आहे. तर गरीब, शेतकरी, तरुण, कामगार आणि छोटे व्यावसायिक त्याच्या फायद्यांपासून वंचित राहतील. महागाई आणि बेरोजगारीवर ठोस उपाययोजना नाही. शेतकऱ्यांसाठी फक्त वरवरच्या योजना आहेत. शिक्षण आणि आरोग्यावरील तरतूदीत कपात करण्यात आली आहे.

**-खा. डॉ. प्रशांत पडोळे**

### अर्थव्यवस्थेला चालना देणारा अर्थसंकल्प



१२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याच्या घोषणेने सर्वाधिक मध्यमवर्गीय समाधानी झाले. विविध ३८ प्रकारच्या औषधांवरील कस्टम ड्युटी रद्द केल्याने गंभीर आजारांवरील औषधे स्वस्त होतील. प्रत्येक जिल्ह्यात कॅन्सर डे केअर युनिट उभारण्याचा निर्णय आरोग्यव्यवस्थेला बळकटी देणारा आहे. १०० जिल्ह्यांची निवड करून शेती विकास योजना राबविण्याचा संकल्प म्हणजे विकसित देशाच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

**-सुनील मेंढे,** माजी खासदार

### अर्थसंकल्प म्हणजे घोषणांचा पाऊस



आज सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात १२ लाख फ्री इन्कम टॅक्सची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात अंमलबजावणीत फरक आहे. दुसरीकडे सरकार जीएसटीमधून सामान्य जनतेची लूट करत आहे. शिक्षण, आरोग्य यावर भरीव तरतूद नाही. कृषी क्षेत्रात बी बियाणे, खते, मशागतीची यंत्रे, इंन्फ्रास्ट्रक्चरवर ठोस काहीही नाही , युवकांसाठी कोणतेही धोरण नाही. ग्रामीण भारत, मनरेगावर अपुरी तरतूद आहे. फक्त खाजगीकरण व विदेशी गुंतवणूक यातून देश चालविण्याचा मानस दिसतो.

**-मोहन पंचभाई,**
काँग्रेस जिल्हाध्यक्ष

### निराशा करणारा अर्थसंकल्प



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प केवळ बिहार आणि आंध्रप्रदेश या दोन राज्यातील नेत्यांना खुश करून केंद्राची सरकार वाचविण्याचा हा केविलवाणा प्रयत्न असून महाराष्ट्राला काही न देता फक्त भोपळाच मिळाला आहे. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कुठलीही उपाययोजना नाही. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी नाही. महाराष्ट्र आणि विदर्भाला काहीच नाही. महाराष्ट्राची निराशा करणारा हा अर्थसंकल्प आहे.

**-चरण वाघमारे,**
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस
शरद पवार पक्ष

### मध्यमवर्गीयांना मोठी भेट



अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी बहुप्रतिक्षित सवलतीची घोषणा करून मोठी कर सवलत दिली आहे. अर्थसंकल्पीय तरतूद असलेले देश विकासाचा प्रवास अखंड सुरू राहील याचे स्पष्ट संकेत आहेत. भारताला जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनविण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पाला ठोस आकार देणारा हा अर्थसंकल्प आहे. मध्यमवर्गाला केंद्रस्थानी ठेवून सादर झालेला हा अर्थसंकल्प मध्यमवर्गासाठी सकारात्मक दिशा देणारा ठरणारा आहे.

**-मुकेश थानथराटे**
जिल्हा उपाध्यक्ष,भाजप

लोकशाही वार्ता
# गोंदिया
नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/११

गुड मॉर्निंग

## आंतरराष्ट्रीय बालिका दिवस संपन्न

**देवरी :** स्थानिक मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या महिला सेल समन्वयक डॉ. सुनीता रंगारी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. यानिमित्त पोलीस स्टेशन देवरी येथील पी. एस. आय. माणिकपुरी, हवालदार नंदेश्वर, पोलीस शिपाई चौधरी तसेच महिला पोलीस शिपाई श्रीमती गजभिये, श्रीमती पुराम व श्रीमती पोगडे यांनी महाविद्यालयास भेट देऊन ' महिला सुरक्षा, पोक्सो कायदा, सायबर क्राईम व सुरक्षा ' याबाबत मार्गदर्शन केले.

लोकशाही वार्ता
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी : जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## दृष्टिक्षेप

### जमिनीच्या खरेदी-विक्रीवरून मारहाण

**सालेकसा :** तालुक्यातील वळद येथे जमिनीच्या खरेदी-विक्री करून दोन आरोपींनी संगनमत करून इसमास मारहाण केली. ही घटना ३१ जानेवारीच्या सकाळी ७ वाजता सुमारासची आहे. सुभाष हिरालाल डोंगरे (४५) व संघर्ष सुभाष डोंगरे (२५) दोन्ही रा. कवडी असे आरोपीचे नाव आहे. सविस्तर असे की, फिर्यादी कुंवरलाल बोपचे याच्या भावाने ४० आर जमिनी विश्वनाथ भगत यांच्याकडून नोटरी करून विकत घेतली होती. मात्र, जमीन मालक सदर जमिनीची रजिस्ट्री करण्यास टाळाटाळ करीत होता. व त्याने जमिन सुभाष डोंगरे याला विकली. घटनेच्या दिवशी फिर्यादीचा भाऊ शेतात गेला असता, खेरदी-विक्रीच्या कारणावरून दोन्ही आरोपींनी संगनमत करून त्याला मारहाण केली. फिर्यादीच्या तक्रारीवरून सालेकसा पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला.

### ट्रकची दुचाकीला धडक

**देवरी :** तालुक्यातील नवाटोला वळणावर ट्रक चालकाने लापरवाही चालवून दुचाकीला धडक दिली. या घटनेत दुचाकी चालक जखमी झाला. ही घटना २९ जानेवारीच्या सकाळी ९.४५ ते १० वाजता सुमारासची आहे. रोहिदास कुंजीलाल कतलाम (५४) रा. घोनाडी असे जखमीचे नाव आहे. तालुक्यातील घोनाडी येथील कुंजीलाल कतलाम हा पत्नीसोबत दुचाकीने आरोग्य शिबिरात देवरी येथे आला होता. दरम्यान काही कामानिमित्त दुचाकी क्र. एमएच.३५/एक्यु. २१६२ ने नवाटोलाकडे जात असतांना वळणावर ट्रक क्र. एमएच.३५/ईसी. ६३३९ च्या चालकाने लापरवाहीने चालवून त्याला धडक देऊन जखमी केला. या घटनेची नोंद फियार्दी रामदास नेताम यांच्या तक्रारीवरून पोलिसात करण्यात आली आहे. या घटनेत ट्रकचालक आरोप शरद महेर रा. निरगुडी जि. संभाजीनगर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### क्षत्रीय पोवार राजाभोज महारॅली ३ फेब्रुवारीला

**गोंदिया :** क्षत्रीय पोवार राजाभोज महारॅली उत्सव समिती गोंदियाच्या वतीने राजाभोज जयंती महोत्सवानिमित्त महारॅलीचे आयोजन दुपारी १२ वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते बालाघाट-शिवनीचे खासदार भारती पारधी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी सहउद्घाटक म्हणून परसवाडाचे आमदार मधू भगत, दीप प्रज्वलक वाराशिवनीचे आमदार विवेक पटेल, कटंगीचे आमदार गौरव पारधी, माजी जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, अखिल भारतीय राष्ट्रीय पोवार महासभेचे अध्यक्ष मुरलीधर टेंभरे, पोवार महासंघाचे अध्यक्ष विशाल बिसेन, राजेंद्र बिसेन, भालचंद्र ठाकूर, मोतीलाल चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार खुशाल बोपचे, कैलाश हरीणखेडे, पं.स.सभापती मुनेश रहांगडाले, हेमंत पटले, खोमेश्वर रहांगडाले, जि.प.सभापती संजय टेंभरे, नेतराम कटरे, झामसिंग बघेले, खेमेंद्र कटरे, ॲड.पृथ्वीराज चव्हाण, सुरेश भक्तवर्ती, राजेश चौहान, किशोर भगत, धनंजय तुरकर, गोंविद तुरकर, एच.एच.पारधी, टी.बी.कटरे, देवरी पं.स.सभापती अनिल बिसेन, तिरोडाचे पं.स.सभापती तेजराम चव्हाण, सालेकसा पं.स.सभापती विणा कटरे, गोरेगाव पं.स.सभापती चित्रलेखा चौधरी, उपसभापती सुनंदा पटले, कौशल तुरकर, प्रवीण पटले, डॉ.प्रशांत कटरे, केतन तुरकर, अशोक हरीणखेडे, बबलु कटरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# गोंदियात सत्ताधाऱ्यांकडून स्वागत तर विरोधक म्हणतात केवळ घोषणा

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शनिवार, १ फेब्रुवारी रोजी सलग आठव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर केला. दरम्यान, गोंदिया जिल्ह्यात या अर्थसंकल्पाचे सत्ताधाऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत करण्यात आले आहे. तर दुसरीकडे विरोधकांनी मात्र, केवळ घोषणा असल्याचे मत व्यक्त केले आहे.

### मोदी सरकारच्या दूरदृष्टीचा ब्लू प्रिंट - आ. विनोद अग्रवाल



अर्थसंकल्प-२०२५ हा प्रत्येक क्षेत्रात विकसित आणि सर्वोत्तम भारत निर्माण करण्याच्या मोदी सरकारच्या दूरदृष्टीचा ब्लू प्रिंट आहे. शेतकरी, गरीब, मध्यमवर्ग, महिला आणि मुलांचे शिक्षण, पोषण आणि आरोग्यापासून ते स्टार्टअप, नावीन्य आणि गुंतवणूक अशा प्रत्येक क्षेत्राला कव्हर करणारा अर्थसंकल्प असल्याचे आ. विनोद अग्रवाल सांगितले.

### अर्थव्यवस्थेला चालना देणारा अर्थसंकल्प : माजी खा.मेंढे



मध्यमवर्गीयांच्या अपेक्षांवर खरा उतरणारा आणि विकसित भारताच्या प्रगल्भ अर्थव्यवस्थेची दिशा निश्चित करणारा असा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी खासदार सुनील मेंढे यांनी दिली.

### केवळ पोकळ घोषणा - माजी आ. दिलीप बनसोड



सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प केवळ पोकळ घोषणा असून १२ लाखापर्यंत करमुक्त केल्यानंतर दुसरीकडे ५ लाखापर्यंत टॅक्स वाढवून सर्वसामान्यांची दिशाभूल केली असल्याचे मत काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आ. दिलीप बनसोड यांनी व्यक्त केले.

### सर्वसमावेशक अर्थसंकल्प -आ.राजकुमार बडोले




आजचा अर्थकसंकल्प सर्वसमावेशक असून यात प्रत्येक वर्गावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. अर्थसंकल्पात सर्वसामान्य नोकरदार, विद्यार्थी, युवावर्ग, शेतकरी, लघु उद्योजकांना भरभरून दिले असल्याचे आ. बडोले यांनी सांगितले.

### सर्वसामान्यांना दिलासा देणारा संकल्प - गजानन डोंगरवार

देशातील आर्थिक उलाढाल वाढेल यात नोकरदार, शेतकरी, लघु उद्योजकांना लाभ होईल. एकंदरीत सर्व सामान्यांच्या गरजा लक्षात घेऊन हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला असल्याचे जनता सहकारी बँकेचे संचालक गजानन डोंगरवार म्हणाले.

### देशाला प्रगतीकडे नेणारा - माजी आ. राजेंद्र जैन



देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद मोदी सरकारतर्फे आज, सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प देशाला प्रगतीकडे घेऊन जाणारा असून यात युवक, आरोग्य, जलजीवन,शेतकरी यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आले असल्याच्या प्रतिक्रीया माजी आ.राजेंद्र जैन यांनी दिल्या.

### प्रत्येकाची काळजी घेणारा अर्थसंकल्प - सीए राजेश चतूर

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प प्रत्येकाची काळजी घेणारा असा आहे. यात मध्यमवर्गीय करदात्यांना एक अनोखी भेट दिली आहे. तर युवा रोजगार, महिला सक्षमीकरण आणि शेतकरी कल्याण याचा विचार करण्यात आला असल्याचे सीए राजेश चतुर यांनी सांगितले.

# एसटीची तिकीट दरवाढ मागे घ्या



### काँग्रेसचे निदर्शने व परिवहन मंत्रालयाला निवेदन

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तिकीट दरात वाढ केली आहे. यामुळे आदीची महागाईमुळे होरपळत असलेल्या सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिक फटका बसला आहे. अलीकडे लाडकी बहिणीच्या नावाखाली देण्यात येणाऱ्या लाभाचा पैसा दुसरीकडून वसूल करण्याचा हा षडयंत्र आहे, असा आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला. तिकीट दरवाढीला घेऊन शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने शहरात निदर्शने करण्यात आली तसचे दरवाढ मागे घेण्यात यावी, अशी मागणीचे निवेदन आगार प्रमुखाच्या माध्यमातून परिवहन मंत्रालयाला देण्यात आले.

यावेळी शहर अध्यक्ष ॲड. योगेश अग्रवाल, जि.प.सदस्य जितेंद्र कटरे, कुडबास उपसभापती पप्पू पटले, बलजीतसिंह बग्गा, चित्रा लोखंडे, अनुपमा पटले, दिनेश गेडाम, अनुप बोरकर, गुलाब निर्वाण, सुनिल गजभिये, शैलेश जायस्वाल, सचिन भांबर्डे, राजेंद्र दुबे, कृष्णा विभार, मंथन नंदेश्वर, मनिष चव्हाण, परेश उजवणे, ॲड. चौरे, प्रकाश आंबेडारे, प्रभू डोंगरे, कैलाश भोयर आदी काँग्रेसचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# चार फेब्रुवारीला लक्ष्मणराव मानकर गुरुजी जयंती

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

दरवर्षीप्रमाणे श्रद्धेय लक्ष्मणराव मानकर गुरुजी यांची जयंती मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ ला दुपारी बारा वाजता स्थानिक फार्मसी कॉलेज लक्ष्मण राव मानकर गुरुजी परिसर आमगाव येथे साजरी होत आहे.

या जयंती समारोहाचे उद्घाटन माजीमंत्री विधान परिषद सदस्य डॉ परिणय फुके यांच्या हस्ते तिरोडा विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ राहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या समारोहाला विशेष अतिथी डॉ नामदेवराव किरसान खासदार गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्र, माजी मंत्री राजकुमार बडोले आमदार मोरगाव/अर्जुनी विधानसभा क्षेत्र, आमदार विनोद अग्रवाल गोंदिया विधानसभा क्षेत्र, आमदार संजय पुराम आमगाव देवरी विधानसभा क्षेत्र यांची उपस्थिती राहणार आहे.

गुरुजींच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक तथा विविध क्षेत्रात कार्यरत परिसरातील कर्मठ अशा व्यक्तींचा सत्कार केला जातो.या श्रृंकलेत डॉक्टर अशोकजी गाडेकर जनरल सर्जन गोंदिया, रामदास शहारे गुरुजी सामाजिक कार्यकर्ते भंडारा, माजी प्राचार्य फनिंद्रनाथजी बिसेन चोपा, बस्तिमलजी तिवारी आमगाव, संस्थापक सचिव श्याम चंदनकर रेणुका बहुउद्देशीय शिक्षण संस्था गोंदिया, तथा संघी अवॉर्डने गुणवंत विद्यार्थ्यांचा अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

या जयंती समारोहाला परिसरातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुरेश बाबू असाटी संस्थेचे सचिव माजी आमदार केशवराव मानकर, उपाध्यक्ष प्रमोद कटकवार, संचालक हरिहर मानकर,रमेश कावळे, ललित मानकर, उर्मिला कावळे, लक्ष्मी नागपुरे, स्नेहा मानकर आणि कार्यक्रमाचे संयोजक प्राचार्य डॉ. डी. के. संघी यांनी केले आहे.

# दोन दिवसांत जलाशयाचे पाणी सोडा अन्यथा जलसमाधी

### शेतकऱ्यांचा यंत्रणेला इशारा

**तिरोडा :** तालुक्यातील चोरखमारा जलाशयातंर्गत येत असलेल्या गावातील शेतकऱ्यांच्या उन्हाळी धान लागवड रखडली आहे. चोरखमारा जलाशयाचे पाणी अद्यापही सोडण्यात आले नसल्याने शेतकरी संकटात आले आहेत. आज ना उद्या पाणी सोडण्यात येणार, या आशेवर शेतकरी दिवस काढत आहेत. परंतु, उन्हाळी धान लागवडीचा वेळ निघत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. परिणामी दोन दिवसांत जलाशयाचे पाणी सोडा अन्यथा जलाशयात उडी घऊन जलसमाधी घेणार, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. या संदर्भात प्रहारतर्फे संबधित विभाग व यंत्रणेला निवेदन देण्यात आले आहे.

चोरखमारा लाभ क्षेत्रातंर्गत येणाऱ्या गावातील शेतकरी उन्हाळी धान पिकांची लागवड करण्यासाठी जलाशयाचे पाणी सोडण्यात येणार, याची प्रतिक्षा करीत आहेत. यातंर्गत पाटबंधारे विभागातंर्गत येणाऱ्या गांगला शाखा पाटबंधारे विभाग चोरखमारा कार्यालय विभागाकडून टाळाटाळ केली जात आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी अनेकदा पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी केली. परंतु, सतत दुर्लक्ष करण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांनी अद्यापही धानाची पेरणी आलेली नाही. उन्हाळी धान लागवडीचा हंगाम निघत चालला असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यामुळे येत्या दिवसात चोरखमारा जलाशयाचे पाणी शेतीसाठी सोडा अन्यथा चोरखमारा जलाशयात उडी घेऊन जलसमाधी घेणार, असा इशारा प्रहारच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी दिला आहे. यामुळे यंत्रणा व पाटबंधारे विभागाचे अधिकारी कोणती भूमिका घेतात? याकडे लक्ष लागले आहे. या संदर्भात उपविभागीय कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, तहसिलदार तिरोडा, ठाणेदार, पोलिस अधिक्षक गोंदिया यांना निवेदन देण्यात आले आहे.

# आशा व गटप्रवर्तकांचा मोर्चा जि.प. वर धडकला




**गोंदिया :** शासन व जिल्हा परिषद स्तरावर प्रलंबित असलेल्या मागण्यांना घेऊन आयटकच्या नेतृत्वात आज ३१ जानेवारी रोजी आशा व गटप्रवर्तकांचा मोर्चा जिल्हा परिषदेवर धडकला. दरम्यान, राज्य शासनाच्या धोरणांचा निषेध नोंदविण्यात आला तसेच विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत राज्य शासनाला देण्यात आले.

आशा व गटप्रर्तकांचा मोर्चा आयटकचे राज्य अध्यक्ष हौसलाल रहांगडाले, जिल्हा कार्याध्यक्ष रामचंद्र पाटील, जिल्हा अध्यक्ष वर्षा पंचभाई, शालुताई उके, कल्पना डोंगरे, माया कोरे, रेखा कानेकर, पुष्तकला रहांगडाले, संघमित्रा मेश्राम, भाविका साठवणे यांच्या नेतृत्वात जिल्हा परिषदेवर मोर्चा काढण्यात आला. दरम्यान आशा कार्यकर्त्यांची सेवा नियमित करण्यात यावी, वेतन श्रेणी व भत्ते देण्यात यावे, ब्लॉक फॅसिलेटर यांना ३४ हजार रुपये व मासिक वेतन देण्यात यावे तसेच निवृत्त वेतन ठरविण्यात यावे, फॅस्सिलेटर यांचे पदनाम सुपरवाजर करण्यात यावे, आशा कार्यकर्त्यांचा प्रोत्साहन भत्त्यात वाढ करण्यात यावी, नौकरीची सुरक्षा कायदेशीर पद्धतीने सुनिश्चित करण्यात यावी यासह अनेक मागण्यांना घेऊन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांशी शिष्टमंडळाने चर्चा केली तसेच मागण्यांचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वानखेडे यांच्या माध्यमातून राज्य शासनाला देण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातील आशा व गटप्रवर्तक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

# अपघातग्रस्तांना आमदार राजकुमार बडोले यांनी दाखविली माणुसकीची जाणीव

**लोकशाही वार्ता / गोंदिया**



मुरदोली-मुंडीपार रस्त्यावर काही दिवसांपूर्वी दोन दुचाकींची भीषण धडक होऊन अपघात घडला. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले. अपघाताच्या काही वेळानंतर त्या मार्गावरून प्रवास करीत असलेले आमदार तथा माजी मंत्री इंजि. राजकुमार बडोले यांनी प्रसंगावधान राखून आपली गाडी थांबवली व जखमींच्या मदतीसाठी पुढे आले.

अपघाताची गंभीरता ओळखून आमदार बडोले यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने जखमींना तत्काळ उपचारासाठी गोरेगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या तत्काळ निर्णयाने व त्वरित कारवाईमुळे जखमींना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळाले, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला. रुग्णालयात दाखल केल्यानंतर आमदार बडोले यांनी रुग्णालय प्रशासनाशी चर्चा करत जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत याची काळजी घेतली. त्यांनी जखमींना धीर दिला व आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या मदतीचे आश्वासन दिले. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी आमदार बडोले यांच्या माणुसकीच्या जाणीवेचे आणि संवेदनशीलतेचे कौतुक केले आहे. संकटाच्या प्रसंगी तत्काळ मदत करणारे नेतृत्व ही समाजासाठी आश्वासक बाब असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

# देवरीत एकल विद्यालयातील आचार्यांचा सत्कार

**लोकशाही वार्ता / देवरी**



वन बंधू परिषद ही एक सामाजिक संघटना असून या अंतर्गत एकल फाऊंडेशन द्वारा ग्रामीण भागातील सर्व सामान्य परिवारातील विद्यार्थ्यांच्या उत्थानासाठी गोंदिया जिल्ह्यात अनेक एकल विद्यालय निःशुल्क सेवाकार्य चालविले जात आहेत.

यात देवरी तालुक्यात देवरी, बोरगाव आणि वडेगाव संचात नव्वद एकल विद्यालय असून संक्रांतीनिमित्त देवरी येथील समाज मंदिरात वडेगाव तथा चिचगड संचातील दोन बेस्ट आर्चायांचा शाल, श्रीफळ, प्रमाण पत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित दोन संचातील इतर साठ आर्चायांना सुद्धा विशेष ब्लँकेट सस्नेह भेट देण्यात आले.

३१ जानेवारीला देवरी नगर पंचायतचे नगराध्यक्ष संजू उईके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सत्कारमूर्ती म्हणून नवनियुक्त सभापती अनिल बिसेन, नगर पंचायतच्या उपाध्यक्ष प्रज्ञा संगीडवार, वन बंधू परिषद नागपूर समितीचे हिमांशू चौधरी, अनूसया अग्रवाल, पूनम तायल, गोंदिया अंचल प्रमुख संगीता चौधरी, देवरी तालुका शिक्षा अंचल प्रमुख पवन अग्रवाल, बोरगांव संच अध्यक्ष यादोराव पंचमवार, सचिव सुरेश चन्ने, वडेगांव संच अध्यक्ष अंजू बिसेन, बोरगांव संच महिला समिती अध्यक्षा शिल्पा बांते, सचिव अनिता चन्ने, सामाजिक कार्यकर्ते बंडू लांडेकर, जिल्हा अंचल प्रमुख शिवकुमार बल्हारे, कार्यालय प्रमुख ईश्वर नागपुरे, प्राथमिक शिक्षा प्रमुख निलकंठ पुराम, शारीरिक प्रमुख प्रवीण गिरी आणि इतर सर्व संच प्रमुख या सर्वांची प्रमुख उपस्थिती होती.

एकल फाऊंडेशन परिवारातील सदस्य तथा पंचायत समितीचे नवनियुक्त सभापती अनिल बिसेन यांचा देवरी फाऊंडेशन तर्फे सत्कार करण्यात आला. यात पुन्हा जि. प. सभापती सविता पुराम यांच्या तर्फे उपस्थित सर्व आचार्यांना संक्रांती निमित्त हिंदू संस्कृतीनुसार हळदी कुंकू लावून वान देण्यात आले.

# वाहन चालविताना हेल्मेट घालून सीटबेल्ट लावूनच प्रवास करावा : भुते

### डुग्गीपार येथे रस्ता सुरक्षा अभियानाचा सांगता

**लोकशाही वार्ता / सडक अर्जुनी**



जिल्हा महामार्ग पोलिस मदत केंद्र डूग्गीपारच्या वतीने ३१ जानेवारी रोजी ३४ वे महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे समापन समारंभ चे आयोजन डूग्गीपार (डोंगरगाव डेपो) येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले होते.

१ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, ३१ जानेवारी रोजी या कार्यक्रमाचे सप्ताहाचे समारोपचे आयोजन करण्यात आले होते. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी तालुका वैद्यकीय अधिकारी प्रणय पाटील, प्रमुख पाहुणे पोलिस उपनिरीक्षक प्रशांत भुते, पोलिस उपनिरीक्षक प्रमोद बोंबाडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनेश लिल्हारे, हरिदास बोरकर, पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजेश मुनीश्वर, संपादक बबलू मारवाडे, संपादक सुशील लाडे, पत्रकार निलेश शाहारे, नितेश नागरिकर अशोका टोल सेंदूरवाफा, आयटीया कॉलेज चे विधार्थी, विद्यार्थिनी ,पोलीस विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी महमानवांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्याअर्पण करण्यात आली.

यावेळी मंचावरून बोलताना प्रशांत भुते पोलिस उपनिरीक्षक, यांनी मार्गदर्शन केले, ते म्हणाले दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट वापरावे ही जनजागृती व्हावी या साठी आम्ही प्रवाशांना मोफत हेल्मेटचे वाटप केले आहेत , त्याच बरोबर रक्तदान शिबीरचे आयोजन करण्यात आले होते. जनजागृतिचे आयोजन दरवर्षी पोलिस विभागाच्या वतीने करण्यात येते.

प्रणय पाटील तालुका आरोग्य अधिकारी यांनी मार्गदर्शन केले, ते म्हणाले की ,दारू पिऊन गाडी चालवू नये, गाडी थांबवून फोन उचलावे, टर्न ओव्हरटेक करू नये, हेल्मेट चा वापर करावे, सीट बेल्ट चे नियमित वापर करावे, १८ वर्षाच्या नंतरच वाहन चालवावे, ड्रायविंग लायसन्स असावी, खबरदारी घेऊनच वाहने चालवावे त्या मुळे अपघात होणार नाही, याची दक्षता घ्यावी, वाहन इन्शुरन्स आणि वाहन लायसन असेल तर अपघात झाल्यास, अपघातात एखादयाचा मृत्यु झाल्यास त्यांना शासनातर्फे आर्थिक भरपाई मिळते, शेतकरी असल्यास गोपीनाथ मुंडे शेतकरी विमाचा लाभ मिळते, रक्तदान नियमित करावे, त्याचा अपघाती नागरिकांना उपयोग होते, ओ निगेटिव्ह आणि ओ पॉझिटिव्ह ब्लड धारकांनी नियमित रक्त दान करावे असेही आव्हाहन केले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष मुनीश्वर यांनी सांगितले की, रस्ता सुरक्षा अभियानादरम्यान गावा गावात जनजागृती करून, १८ वर्षावरील नागरिकांना रस्ता सुरक्षा बद्दल जनजागृती करून माहिती द्यावी, जेणेकरून होणारे अपघात टाळता येतील, असे सांगितले. लाडे यांनी विविध उदाहरण देऊन शालेय विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन पोलिस उपनिरीक्षक दिनेश लिल्हारे यांनी केले तर आभार प्रदर्शन पोलिस उप निरीक्षक प्रशांत भुते यांनी केले.

लोकशाही वार्ता
# गडचिरोली
नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/१२

गुड मॉर्निंग

## वाकडी परिसरात वाघाचा संचार

**गडचिरोली :** तालुक्यातील वाकडी, मुडझा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वाघाचा वावर असून, लोकांना वाघाचे अधूनमधून दर्शन होत आहे. त्यामुळे शेतावर जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये वाघाबाबत दहशत निर्माण झाली असून शेतकरी शेतावर जाण्यास घाबरत आहेत. वाकडी परिसरातील आठ ते दहा किमी अंतर परिसरात वाघाचा वावर आहे. हा वाघ अधूनमधून नागरिकांना दिसून येतो. सकाळी व सायंकाळच्या सुमारास गडचिरोली-चामोर्शी मार्गावरही रस्ता ओलांडताना दिसतो. सदर वाघाचा तत्काळ बंदोबस्त करण्याची मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत.

## चुरचुरा-पिपरटोला मार्गाची दैनावस्था

**गडचिरोली:**तालुक्यातील चुरचुरा-पिपरटोला हा परिसरातील महत्वाचा मार्ग आहे. पिपरटोलानंतर पुढे धुडेशिवणी, अमिर्झा येथे जाता येते. कुऱ्हाडी, महादवाडी परिसरातील अनेक नागरीक याचा मार्गाने जातात. हा मार्ग जंगलाने व्यापलेला आहे. त्यामुळे वाहनधारक वेगाने वाहने नेतात. मात्र या मार्गाची मागील अनेक वर्षापासून दुरुस्ती न करण्यात आल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने अपघाताची शक्यता बळावली आहे. त्यामुळे सदर मार्गाकडे संबंधित विभागाने लक्ष देऊन सदर मार्गाची तत्काळ दुरूस्ती करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### दृष्टिक्षेप

## आरमोरी तालुक्यात वाढले मक्याचे क्षेत्र

**आरमोरीः** कमी खर्चात चांगले उत्पादन होत असल्याचा अनुभव शेतकऱ्यांना येत असल्याने तालुक्यात मका पिकाखाली क्षेत्र वाढत चालले आहे. विविध योजनांचा लाभ घेत शेतकऱ्यांनी शेतात विहिरी खोदल्या आहेत. शासनाने सौरकृषीपंप उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध घली आहे. धानाचे पीक निघाल्यानंतर शेतजमीन पडिक राहण्याच्या ऐवजी शेतकरी मका पिकाची लागवड करीत आहेत. चार महिन्यांच्या कालावधीत मका पीक परिपक्व होऊन विक्रीस उपलब्ध होते. मका पिकाला अतिशय कमी प्रमाणात पाण्याची गरज भासते.

## गोकुलनगरात घाणीचे साम्राज्य

**गडचिरोलीः** शहराच्या गोकूलनगर भागात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. घाणीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगरपालिका प्रशासनाने या भागात स्वच्छता मोहीम राबवावी, गोकूलनगर येथील फालातला कचरा तत्काळ उचलण्यात यावा, अशी मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली. तलावावरील माता मंदिराजवळ सुद्धा कचरा पडलेला आहे. त्या ठिकाणी कचरापेटी ठेवण्यात यावी. नाल्या पूर्ण स्वच्छ न करता कामगार तशाच ठेवतात. समस्यांचे निराकरण करावे, अशी मागणी घनश्याम वाढई, जावेद खान, प्रफुल आंबोरकर, माजिद सय्यद यांनी केली आहे. पावसाळ्याच्या दिवसात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहत असल्याने अनेक गावात मुख्य रस्त्याच्या बाजुला नागरिक घरातील काडीकचरा, बैलांचा मलमूत्र एका खड्ड्यात टाकत असतात. यामुळे ये-जा करणाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो.

# जलजीवन मिशनच्या माध्यमातून भागविणार तहान

### योजनांसंबंधी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने दिलेले निर्देश

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

ग्रामीण भागातील नागरीकांना नळाच्या माध्यमातून पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी जलजीवन मिशनच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यातील अनेक गावात पाणीपुरवठा योजनांची कामे केली जाणार आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरीकांची तहान भागविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ज्या पाणीपुरवठा योजनांना यापूर्वी प्रशासकीय व तांत्रीक मान्यता प्रदान केली होती. अशा योजनांच्या सुधारित अंदाजपत्रकास आता शासनाने मान्यता प्रदान केली आहे.



जीएसटी दर, तांत्रिक बदलामुळे सुधारित प्रशासकीय० जिल्ह्यातील अनेक गावांतील पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सुधारित किमतीत उर्वरित सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य अभियंता यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

जिल्ह्यातील योजनांसंबंधी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने दिलेले निर्देश सदर योजनेसही लागू राहतील व त्याची अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील. या योजनेस सहमती दिलेल्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तसेच तांत्रिक मान्यता देतांना नमूद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ही योजना पूर्ण झाल्यावर ती संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात यावी. संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून योजना प्रत्यक्षात पूर्ण झाली आहे, या आशयाची सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत योजना ताब्यात घेण्यास संबंधीत ग्रामपंचायत, जिल्हा परिषद जबाबदार राहील. योजना प्रत्यक्षात पूर्ण झाल्यावर लगेच संबंधित कार्यकारी अभियंता व संबंधित ग्रामपंचायतचे अधिकारी यांनी योजनेची संयुक्तपणे पाहणी आयोजीत करावी आणि अशा या गावांच्या नळयोजनांना मिळाली सुधारित प्रशासकीय मान्यता कन्हाळगांव ता. धानोरा, कन्हारटोला मेंढा ता. धानोरा, वडसा खुर्द ता. एटापल्ली, कटेझरी-ता. धानोरा, उडेरा-तालुका एटापल्ली, भिकारमौशी ता. गडचिरोली, नवरगांव - तालुका गडचिरोली, भूमलान-ता. एटापल्ली, मंगुठा-ता. एटापल्ली, हिकेर ता. एटापल्ली, पुस्कोटी ता. एटापल्ली, रानमुल ता. गडचिरोली, रेंगागांव-ता. धानोरा, सलंगटोला-ता. धानोरा, काकडयेली-ता. धानोरा, गजामेंढी-ता. धानोरा, जपतलाई-ता. धानोरा, निमगांव-ता. धानोरा, दुगार्पूर-ता. धानोरा, सोडे-ता. धानोरा, मंगेवाडा ता. भामरागड तसेच जांगदा ता. धानोरा यांचा समावेश आहे.

# बसस्थानकात जनावरांचा मुक्काम

### जुन्या बसस्थानकातील प्रकार, स्थानिक प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

**लोकशाही वार्ता/ आरमोरी**

प्रवाशांना उन्ह, वारा, वादळ, पाऊस यापासून संरक्षण व्हावे, यासाठी आरमोरी येथे गडचिरोली मार्गावर बसस्थानक उभारण्यात आले आहे. या बसस्थानकाला जुने बसस्थानक म्हणूनही ओळखले जाते. परंतु, मागील अनेक वर्षापासून या बसस्थानकाच्या स्वच्छतेकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सध्या हे बसस्थानक 'प्रवाशांचे नव्हे तर गुराढोरांचे म्हणण्याची वेळ तेथे गेल्यावर दिसून येते. बस येण्याअगोदर बसची प्रतीक्षा करण्यासाठी प्रत्येक तालुका, ग्रामीण भागात बसस्थानके संबंधित विभागाद्वारे बांधली गेली आहेत.

सदर बसस्थानक स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची आहे. असे असतानाही आरमोरी शहरातील गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावरील असलेले बसस्थानक सध्या घाणीच्या विळख्यात सापडले आहे. सदर बसस्थानक मोडकळीस आले असून, दुर्गंधी व दुरवस्थेमुळे प्रवाशांना जवळच्या पानटपरीजवळ उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. सदर बसस्थानक परिसरात घाणीच्या साम्राज्यासह मोकाट जनावरे, डुकरांचा वावर राहत असल्याने प्रवाशांना नाक दाबून राहावे लागते. आरमोरी शहर हे नगर परिषदेचे ठिकाण आहे. नगर परिषद क्षेत्रातील मुख्य रस्त्यासह गल्ली, पोटगल्लीसह, नाली सफाई, शहरातील साफसफाई व स्वच्छता ठेवण्यासाठी एका कंत्राटदराला कंत्राट देण्यात आले आहे. सदर कंत्राटदाराने आपल्यास्तरावरून शहरात साफसफाई व स्वच्छतेसाठी महिला व पुरुष मजुरांना रोजंदारीवर ठेवले आहे. परंतु, कंत्राटदाराचे या सफाई मजुरांवर योग्य नियंत्रण नसल्याने शहरात जागोजागी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच वेळवर नाली उपसा होत नाही. त्यामुळे शहरात स्वच्छतेसंबंधी समस्या वाढीला लागल्या आहेत. अस्वच्छतेमुळे साथीचे आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. न. प. प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला शहरातील साफसफाईची कामे योग्यरितीने करण्याच्या सूचना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून केली जात आहे. प्रशासकराजमुळे शहराचा विकास खुंटला नगर परिषदेतील सत्ताधाऱ्यांचा ५ वर्षांचा कालावधी संपल्यामुळे स्थानिक नगर परिषदेचा कारभार प्रशासकाच्या खांद्यावर आहे.

# आधारित पूरक उद्योगासाठी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा

**लोकशाही वार्ता/गडचिरोली**

जिल्ह्यातील लोह उद्योगात वाढ होत असल्याने येत्या काळात लोह उत्पादनावर आधारित पूरक उद्योगांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात अधिकाधिक लोह आधारित पूरक उद्योग निर्मितीसाठी उद्योग मित्रांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी केले. जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने आयोजित जिल्हा उद्योगमित्र, जिल्हा सल्लागार समन्वय समिती, जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती आणि जिल्हा स्थानिक लोकांना रोजगार सनियंत्रण समितीच्या संयुक्त सभेत ते बोलत होते. जिल्ह्यातील सुशिक्षित युवकांना कौशल्य प्रशिक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कंपन्यांनी पोर्टलवर नोंदणी करावी, तसेच जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाने युवकांना अधिकाधिक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश गायकवाड, जिल्हा कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेंद्र शेंडे यांसह जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा अग्रणी बँक, नाबार्ड, खादी ग्रामोद्योग, नगररचना, विज महावितरण कंपनी, एम. आय. डी. सी., कामगार विभाग, खनिकर्म विभाग इत्यादी विभागांचे प्रतिनिधी आणि गडचिरोली जिल्ह्यातील उद्योग संघटना आणि इतर उद्योजक हजर होते.

# शिवाजी महाविद्यालयात पालक तथा माजी विद्यार्थी व पदवीदान समारंभ संपन्न

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

स्थानिक शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली येथे दिनांक ३१ जानेवारी २०२५ ला पालक तथा माजी विद्यार्थी पदवीदान समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. चंद्रकांत शिवणकर, मा. हेमंतभाऊ जम्बेवार, मिलिंद घरोटे, डॉ. व्ही. आर. खुणे, मराठी विभाग प्रमुख तसेच महाविद्यालयचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. श्री गोविंदरावजी बानबले, सचिव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली यांनी भुषविले.



कार्यक्रमाची सुरवात राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज याच्या प्रतिमेला माल्यार्पण व दिपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांनी या कार्याक्रमची रूपरेषा तसेच हा कार्यक्रम घेण्यामागचा हेतू सांगितला. व्यासपीठावरून बोलतांना हेमंत जम्बेवार यांनी महाविद्यालयाबाबत बोलतांना सांगितले की, या महाविद्यालयातून नेहमीच चांगली भविष्यकालीन पिढी घडविण्याचे कार्य केले आहे, मी सुद्धा या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे, असे अभिमानाने सांगितले तसेच विध्यार्थ्यांना या स्पर्धेच्या युगात जगण्याचा मूलमंत्र याविषयी मार्गदर्शन केले. तसेच चंद्रकांत शिवणकर,मिलिंद घरोटे व डॉ. व्ही. आर. खुणे यांनी सुद्धा व्यासपीठावरून मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे माजी विद्यार्थी आणि काही पालक वर्गानी सुद्धा आपले महाविद्यालयाबाबतचे मत मांडले. शेवटी अध्यक्षीय भाषणाद्वारे गोविंदरावजी बानबले सचिव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली यांनी व्यासपीठावरून बोलतांना सांगितले की या महाविद्यालयात प्रवेशित घेणाऱ्या विध्यार्थ्यार्ला प्रत्येक सोयी आणि सुविधा पुरविल्या जाईल. नवनवीन भाविष्यकाली अभ्यासक्रम आणि विषय आणल्या जाईल, तसेच पालक आणि माजी विद्यार्थ्यांनी सुचविलेल्या सूचनांचे पालन केल्या जाईल, अशी ग्वाही दिली. यानंतर मागील सत्रातील उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांना पदवीदान समारंभ संपन्न झाला.

या कार्याक्रमचे सूत्रसंचालन मुधोळकर तर आभार प्रा. एस. पी. ढोमणे सांकृतिक विभाग प्रमुख यांनी मानले. या कार्यक्रमाला निमंत्रित पालक तथा माजी विद्यार्थी उपस्थित होते. तसेच वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## आठवडी बाजारात वाहतुकीची कोंडी

**कोरचीः** येथील आठवडी बाजार गुरुवारी भरण्यात येतो. परंतु आठवडी बाजारात जाण्याचा मार्ग हा मुख्य बाजारपेठेचा असून, सदर मार्गातून बरेच मोठ्या वाहनांची वर्दळ असते. यामुळे सामान्य नागरिकांना बाजार करताना अडचणीचा सामना करावा लागतो. या मार्गातून मोठे वाहन गेले असता. पदचारी लोकांना हा त्रास सहन करावा लागतो. बराच वेळपर्यंत वाहतूक कोंडी निर्माण होताना दिसून येत आहे. सदर बाजाराच्या दिवशी मोठ्या वाहनांना बायपास मार्गावरून मार्गक्रमण करण्यात यावे. अशी मागणी कोरची तालुक्यातील जनतेकडून करण्यात येत आहे. संबंधित बाबीकडे नगरपंचायत व पोलीस विभागाच्या अधिकाऱ्याने लक्ष देऊन ही समस्या सोडवण्यात यावी अशी मागणी जनतेकडून होत.

# विविध स्पर्धांच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान संपन्न

### विद्यार्थीच नव्हे तर समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत रस्ता सुरक्षेचा संदेश देण्यासाठी महात्मा गांधी महाविद्यालय अग्रेसर

**लोकशाही वार्ता/ आरमोरी**

अपघाताचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. वाहनांची संख्या खूप वाढल्याने व वाहतूक नियमांचे पालन चालकांकडून नीट होत नसल्याने व उपप्रादेशिक परिवहन विभागाचे काम वाढून अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करताना विभागावर अतिरिक्त ताण येणे स्वाभाविकच आहे. अशावेळी युवा पिढीने जागरूक होऊन स्वतः व आसपासच्या लोकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे यासाठी सकारात्मक प्रयत्न केल्यास वाहतूक सुरक्षेच्या ऐरणीवर आलेल्या प्रश्नाचे निश्चितच निराकरण करणे शक्य आहे असे प्रतिपादन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गडचिरोली येथील मोटार वाहन निरीक्षक किरण शिंदे यांनी केले.



स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व . नसरुद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय आरमोरीच्या वतीने सत्र २०२४-२५ मधील रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध रस्ता सुरक्षा स्पर्धांच्या बक्षीस वितरणाचा सोहळा पार पडला. बक्षीस वितरण सोहळ्याला अध्यक्ष म्हणून माहत्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा तर अतिथी म्हणून मोटर वाहन निरीक्षक अभय सोळंकी, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. डॉ. नोमेश मेश्राम उपस्थित होते.

रस्ता सुरक्षेबाबत महाविद्यालय निरंतर कटिबद्ध असून रस्ता सुरक्षा अभियान हा महाविद्यालयाचा नेहमीच उत्कृष्ट उपक्रम ठरला आहे. फक्त विद्यार्थीच नव्हे तर समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत रस्ता सुरक्षेचा संदेश देण्यासाठी महाविद्यालय अग्रेसर आहे असे विचार प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी व्यक्त केले.

यांप्रसंगी रस्ता सुरक्षा प्रश्नमंजुषा स्पर्धेतील गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी प्रतीक मारोडकर, दर्शना हिरालाल कांबळे, गायत्री महादेव माकडे, निबंध स्पर्धेतील करण कुंडलिक दिघोरे, दिव्या विकास बावणे, प्रियंका रवींद्र बोरकर, वक्तृत्व स्पर्धेतील रोहित दिवाकर मेश्राम, अभिजीत गुलाब मेश्राम, श्रुती प्रकाश पडवार यांना बक्षीसाच्या रूपात उपप्रदेशिक परिवहन विभाग गडचिरोली यांचे कडून हेल्मेट प्रदान करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षाविषयी जाणीव जागृती व्हावी यासाठी रस्ता सुरक्षा मार्गदर्शकेचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर तर आभार प्रदर्शन रस्ता सुरक्षा समन्वयक प्रा. डॉ. नोमेश मेश्राम यांनी केले बक्षिस वितरण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. गजेंद्र कढव, प्रा. डॉ. किशोर वासुर्के, प्रा. सुनंदा कुमरे, प्रा. डॉ. कविता खोब्रागडे, प्रा. डॉ. मनोज ठवरे व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बंदिस्त नाल्या देताहेत आजाराला आमंत्रण

### उपस्याअभावी दुर्गंधीची समस्या बनली गंभीर, न. प. प्रशासनाचे दुर्लक्ष

**लोकशाही वार्ता/आरमोरी**

शहराला नगर परिषदेचा दर्जा प्राप्त होऊन अनेक वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र, शहरातील समस्या अद्यापही सुटल्या शहरवासीयांमध्ये नसल्याने प्रशासनाप्रती कायम ओरड असते.

यापैकीच महत्वाची समस्या म्हणजे सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याची आहे. शहरातील अनेक वॉर्डात बंदिस्त नालीचे बांधकाम करण्यात आल्या आहेत. या बंदिस्त असल्याने नाल्यांचा नियमित उपसा करण्यात न आल्याने अस्वच्छतेसह दुर्गंधीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. शहर विकासाच्या नावावर नको तिथे बंदिस्त नाल्या बांधण्यात आल्या. मात्र, नाल्यांच्या उपशाकडे दुर्लक्ष केल्या जात .



नागरिकांचे आरोग्यावर धोक्यात आले आहे. या गंभीर बाबीची दखल घेत स्थानिक नगर परिषद प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शहरवासीयांकडून होत आहे. शहरातील प्रत्येक प्रभागातील सांडपाणी वाहून जाण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायत प्रशासनाने खुल्यानाल्या पुर्णतः तुंबून गेल्या आहेत. तसेच नाल्यांचा वर्षानुवर्षे नियमित उपसा करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने सांडपाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे अनेक नागरिकांच्या घरासमोर घाण पसरली आहे.

नाल्यांचे बांधकाम केले होते. त्यानंतर शहराला नगर परिषदेचा दर्जा प्राप्त होताच प्रशासनाला कोट्यवधींचा निधी प्राप्त झाला. या निधी अंतर्गत शहर विकासाच्या नावावर न. प. प्रशासनाने संबंधित सार्वजनिक नाल्यांची तोडफोड करून नको तिथे बंदिस्त नालीचे बांधकाम केले. मात्र, बंदिस्त नाली बांधकाम करताना सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लागणार की नाही, याची शहानिशा करण्यात आली नाही. परिणामी, बंदिस्त दुर्गंधीयुक्त साम्राज्यामुळे साथीचे रोग बळावून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नगरपालिका प्रशासनाने याचे गांभीर्य लक्षात घेत तत्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक 'बँको ब्ल्यू रिबन' पुरस्काराने सन्मानित

### बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

**लोकशाही वार्ता/गडचिरोली**

देशातील ३७० जिल्हा सहकारी बँकांच्या श्रेणीतून सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा सहकारी बँकांना बँकोतर्फे सन २०२३-२४ यावर्षीचा बँको ब्ल्युरिबन २०२४' प्रथम पुरस्कार दि. गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नुकताच लोणावळा येथे विशेष समारंभात प्रदान करण्यात आला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक बागेश्वर बॅनर्जी यांच्या हस्ते दि गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष श्रीहरी भंडारीवार, मानद सचिव अनंत साळवे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश आयलवार यांनी पुरस्कार स्वीकारला.



दि. २८ जानेवारी २०२४ ला लोणावळा येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला देशातील ३७० जिल्हा सहकारी बँकांचे पदाधिकारी, संचालक, कार्यकारी संचालक व अधिकारी उपस्थित होते. देशातील ३७० जिल्हा सहकारी बँकांमधून रिझर्व बँकेच्या आर्थिक निकषानुसार उत्कृष्टपणे काम करणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या सक्षम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सलग आठव्या वर्षी पुरस्कार पटकाविला

गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ५७ शाखा व ३८ ए.टी.एम.च्या माध्यमातून जिल्ह्यातील ग्राहकांना अत्याधुनिक बँकींग सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. बँकेने दि. ३१ मार्च २०२४ च्या आर्थीक स्थितीवर ३ हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पार केलेला आहे. बँकेने ग्राहकांना मोबाईल बँकिंग व क्यू आर कोड तसेच आय. एम. एस. सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. व नुकतेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून बँकेला इंटरनेट बँकिंगचा परवाना प्राप्त झालेला आहे.

दरवर्षी बँको पुरस्कार दिल्या जातो. सन २०२३-२४ या आर्थीक अर्षात ठेववृद्धीमध्ये ज्या जिल्हा बँकांच्या ठेवी २,५०० ते ३,००० कोटीच्या ठेवी आहेत त्या जिल्हा बँकांच्या श्रेणीमधून तसेच रिजर्व्ह बँक व नाबार्डच्या आर्थिक निकषानुसार एन.पी.ए. चे प्रमाण, सी. आर. ए. आर. आदी निकषात बँक पात्र झालेली असून दि. ३१ मार्च २०२४ च्या आर्थिक स्थितीवर बँकेचे ग्रॉस एन.पी.ए. १.३० टक्के आहे. बँकेने आर्थीक निकषात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल बँको समितीने राष्ट्रीय स्तरावरच्या सन २०२४ या वर्षाचा बँको ब्ल्यू रिबन पुरस्काराने बँकेला सनन्मानित केलेले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल बँकेचे अध्यक्ष प्रचित पोरेड्डीवार, पदाधिकारी व संचालक यांनी जिल्ह्यातील शेतकरी वर्ग, ठेवीदार, पगारदार कर्मचारी, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, महिला बचत गटांचे सदस्य व हितचिंतक तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकायार्मुळे बँकेला हे यश प्राप्त करता आले असे बँकेचे अध्यक्ष प्रचित पोरेड्डीवार यांनी सांगितले.

# स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांना करावी लागणार प्रतीक्षा

**लोकशाही वार्ता/गडचिरोली**

प्रशासकराज सुरू असलेल्या जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायत व पंचायत समितीमधील ओबीसी आरक्षणाची सुनावणी पुन्हा लांबणीवर गेली. या आरक्षणासंदर्भातील याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आता २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सुनावणी होईल. त्यामुळे सध्या तरी सार्वत्रिक निवडणुकीचे काही खरे नाही. यामुळे इच्छुकांना आणखी काही काह प्रतिक्षा करावी लागणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत जिल्हा परिषद समित्या, नगरपालिका व नगरपंचायतीवर पहिल्यांदाच इतका दीर्घकाळ प्रशासकराज सुरू आहे.

तीन-साडेतीन वर्षापासून सार्वत्रिक निवडणूक झाली नाही. दरम्यान, तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने चारऐवजी तीन सदस्यांची प्रभागरचना केली. दरम्यान, ओबीसीसाठी राखीव जागांचा गांचा मुद्दा न्यायालयात गेला. तेव्हापासून हा तिढा सुटला नाही. निवडणुका रखडल्याने जिल्हा परिषदेत सदस्य व पालिकेत नगरसेवकच नाहीत. त्यामुळे समस्यांवर लक्ष ठेवणे, त्या सोडवणे, दैनंदिन कारभार चालवणे आदी कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

लोकप्रतिनिधी असताना समस्यांचे निराकरण करणे व निवडणुकीसाठी सरसावलेले फिरले माघारी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयानंतर लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लागेल, म्हणून इच्छुक उमेदवारांनी आपापल्या प्रभागात तसेच जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या गणात मतदारांच्या गाठीभेटी वाढविल्या. जनसंपर्क कार्यक्रमांचेही नियोजन केले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची शक्यता व प्रभागरचनेचा अंदाज घेऊन इच्छुक मतदारांशी सलगी वाढविण्याची एकही संधी सोडत नव्हते. मात्र, ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी लांबल्याने इच्छुकांच्या आशांवर पाणी फेरले आहे. २५ फेब्रुवारी रोजी होणारी न्यायालयातील सुनावणी कुणाच्या बाजुने, याकडे सर्वांचे नजरा लागल्या आहेत.




लोकशाही वार्ता
# वर्धा

नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/९

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


## ट्रकसमोर उडी घेत व्यक्तीची आत्महत्या

**समुद्रपूर :** नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील जाम येथे जमदापूर येथील व्यक्तीने कारमधून उतरून ट्रकच्या समोर उडी घेतल्याने त्याचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. ही घटना ३० रोजी ११.३० वाजताच्या सुमारास घडली. श्रीनिवास नर्सिंग्लू सुकनाल (वय ३५) रा. जमदापूर जि. अदिलाबाद असे मृताचे नाव आहे. श्रीनिवास हा त्याच्या कुटुंबासह टीजी.०१, ८००९ क्रमांकाच्या कारने प्रयागराज ते आदिलाबाद जाम मार्गे जात असतात हिंगणघाट रोड येथे आल्यावर लघुशंका करण्याच्या निमित्ताने कारखाली उतरून त्याने हैदराबादकडे जाणाऱ्या ट्रकसमोर उडी मारली. अपघातात त्याचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला.

## कुजलेल्या स्थितीत आढळला मृतदेह

**समुद्रपूर :** तालुक्यातील शेडगाव शिवारात कुजलेल्या अवस्थेत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. २९ रोजी शेडेगाव शिवारात ईस्माईल समडोये यांच्या शेताजवळ एका व्यक्तीचा मृतदेह मिळून आला.

पोलिस पाटील यांनी याबाबत समुद्रपूर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला.

# शासकीय रुग्णालयात बाळांना विनामूल्य लस उपलब्ध




**लोकशाही वार्ता/वर्धा**

बाळाचा जन्म झाल्यानंतर होणाऱ्या आजारांपासून त्याचे संरक्षण करण्यासाठी तत्काळ लसीकरण करणे गरजेचे असते. ठरावीक कालावधीत व वयोगटानुसार बाळाला पोलिओ, गोवर, क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, कावीळ, इन्फ्लुएन्झा बी आणि धनुर्वात या आजारांचा प्रतिबंधात्मक लसी दिल्या जातात. या सर्व लसी सर्व शासकीय रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत दिल्या जातात. शासनाच्या या सेवांचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज. पराडकर यांनी केले आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सार्वत्रिक लसीकरण सेवा सत्र ३२ प्राथमिक आरोग्य केंद्रात, १८३ उपकेंद्रात, ३६ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व नागरी आयुष्यमान आरोग्य मंदीर तसेच प्रत्येक गावातील अंगणवाडीमध्ये मोफत दिली जाते.

बीसीजी लस बाळाला जन्म झाल्यानंतर लगेच किंवा एक वर्ष पुर्ण होईपर्यंत द्यावी. ही लस क्षयरोग होऊ नये म्हणून दिली जाते.

हिपॅटायटीस बी हा यकृताला संक्रमित करणारा विषाणू आहे. त्यामुळे हिपॅटायटीस बी ही लस जन्मतः ४८ तासाच्या आत दिली जाते. या लसीचा समावेश पेंटा व्हॉयलेंट या लसीमध्ये करण्यात आला आहे.

ओरल पोलिओ बाळ जन्मल्यापासून ते ५ वर्षापर्यंत देण्यात येते या लसीमुळे पोलिओ आजारापासून संरक्षण होते.

पेंटा व्हायलेंट या लसीमुळे घटसर्प, डांग्या खोकला, कावीळ, इन्फ्लुएन्झा बी आणि धनुर्वात या पाच आजारांपासून बाळाचे संरक्षण होते. गोवर रुबेला ही लस वय ९ महिने पुर्ण ते १५ वर्षापर्यंत देण्यात येते. या लसीमुळे गोबर व रुबेला आजारापासून संरक्षण होते.

### लसीकरणाचे फायदे

ठराविक कालावधीत लस दिल्यास आजाराच्या संक्रमणाशी लढण्यासाठी आणि आपल्याला निरोगी ठेवण्यासाठी शरीराची प्रतिकार शक्ती वाढवितात. लहान मुलांसाठी धोकादायक किंवा प्राणघातक असलेल्या अजारांना लसीकरण प्रतिबंध करते.

## सहा दिवसांपासून बेपत्ता असलेल्या मांडगावच्या युवकांचे मिळाले प्रेत

**मांडगांव :** गेल्या सहा दिवसांपासून घरून बेपत्ता असलेल्या मांडगांव येथील युवकाचा अखेर शेडगाव नाका गावालगत जिर्ण अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली.

पियुश अरुण वैद्य वय १८ वर्ष रा. घुसपुरा वार्ड मांडगाव असे मृतक युवकाचे नावं आहे. तो दि. २३ जानेवारीपासून घरून बेपत्ता होता. या बाबत हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

परिसरात दुर्गंधी पसरल्याने चौकशी केली असता जिर्ण अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मृतकाच्या वडील आणि भावाने मोबाईल, चप्पल आणि कपड्यांवरून मृतदेहाची ओळख पटवली. आज त्याचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.प्रियुश अरुण वैद्य हा मांडगांव येथील यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात १२ व्या वर्गात शिक्षण घेत होता. आणि ३ दिवसांनंतर त्यांच्या मोठ्या भावाचे लग्न होते.

## सुट्या पैशांच्या वादावर एसटीची यूपीआयची मात्रा..!

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची सूचना

**लोकशाही वार्ता/वर्धा**

प्रवाशांच्या तक्रारी व वाहकांना होणारा त्रास यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दखल घेऊन केलेल्या सूचनेनुसार सुट्ट्या पैशावरून वाहक आणि प्रवाशांच्या मध्ये वाद होऊ नये यासाठी एसटीने प्रवाशांना यूपीआय पेमेंट द्वारे तिकीट काढण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद मिळत असून मागील काही दिवसांपासून यूपीआय पेमेंट द्वारे मिळणारे उत्पन्न दुपटीने वाढले आहे. याबरोबरच महामंडळाने परिपत्रक काढून वाहकांना कर्तव्यावर जाण्यापूर्वी आग्रधन रकमेमध्ये १०० रुपयापर्यंत सुट्टे पैसे देण्याची निर्देश स्थानीक प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे वाहक आणि प्रवासी यांच्यातील सुट्ट्या पैशावरुन होणारे वाद टाळले जाऊ शकतात.

एस. टी. महामंडळाने प्रत्येक वाहकाकडे अँड्रॉइड इलेक्ट्रॉनिक तिकीट इशू मशीन (एऊघ्र) दिले आहेत. या मशीनच्या माध्यमातून यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढले जाऊ शकते. त्यामुळे प्रवाशांनी तिकीट काढताना या यूपीआय पेमेंटचा वापर केल्यास सुट्ट्या पैशामुळे होणारे वाद टाळता येतील. अशी सूचना मंत्री सरनाईक यांनी केली होती. त्यानुसार महामंडळाने यूपीआय पेमेंट वाढविण्यासाठी प्रयत्न केला. गेल्या काही दिवसांमध्ये युपीआय पेमेंट द्वारे तिकीट काढणा?यां प्रवाशांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली असून मागील काही दिवसांच्या तुलनेमध्ये युपीआय पेमेंट द्वारे मिळणारे उत्पन्न दुपटीने वाढले आहे. तसेच एका परिपत्रकाद्वारे सूचना देऊन वाहकांना कर्तव्यावर जाण्यापूर्वी आग्रधन म्हणून सुट्टे पैसे देण्यात यावेत, अशा सूचना महामंडळाने स्थानिक प्रशासनाला दिल्या आहेत. भविष्यात वाहक आणि प्रवासी यांच्यामध्ये सुट्ट्या पैशावरून वाद उद्‌भवणार नाहीत, याची काळजी महामंडळाने घ्यावी, अशी सूचना देखील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

## दृष्टिक्षेप

### गर्भलिंग निदान करून गर्भपात करणाऱ्यांची माहिती देणाऱ्या १ लाखाचे बक्षीस

**वर्धा :** पीसीपीएनडीटी कायद्यानुसार बेटी बचाव बेटी पढाओ मोहिमेअंतर्गत जिल्ह्यामध्ये कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता जनसामान्यांना कायद्याची माहिती होण्याकरिता तसेच गभलिंग निदान करुन गर्भपात करण्याकरिता प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तींची माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयाचे बक्षीस देण्यात येणार आहे. यासाठी गर्भलिंग निदान करून गर्भपात करणाऱ्यांची माहिती असणा-यांनी या संकेत स्थळावर किंवा १८००२३३४४७५/१०४ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी केले आहे. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असुन माहिती देणा-या व्यक्तीला खबरी योजनेंतर्गत कोर्ट प्रकरण दाखल केल्यानंतर १ लाख रुपयाचे बक्षीस देण्यात येईल. जिल्हा शल्य चिकित्सकांनी कळविले आहे.

### उपचारादरम्यान व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा :** उपचारार्थ दाखल अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाला. अपघातात जखमी झालेल्या ४० वर्षीय व्यक्तीवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली.

### वीट मारून केले जखमी

**वडनेर :** किरकोळ कारणातून सुशांत चंद्रकांत महाजन याला हेमंत सुरेश बुरडकर याने विटेने मारून जखमी केले. ही घटना बोपापूर गावात घडली. याप्रकरणी वडनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### मुलास फूस लावून पळविले

**पुलगाव :** अल्पवयीन मुलास फूस लावून पळवून नेले. १० वर्षीय मुलगा क्रिकेट खेळण्यासाठी गेला होता.

मात्र, तो उशिरापर्यंत घरी आला नाही. त्याचा शोध घेऊनही तो मिळून न आल्याने त्याला अज्ञाताने फूस लावून पळविल्याची तक्रार घरच्यांनी पोलिसांत दिली.

### दहशत पसरविणाऱ्यास अटक

**वर्धा :** सार्वजनिक ठिकाणी हातात सत्तुर घेऊन दहशत पसरविणाऱ्या गौरव राजेश यादव (२५, रा. मास्टर कॉलनी) याला शहर पोलिसांनी अटक करून गुन्हा दाखल केला. तो शस्त्राचा धाक दाखवून नागरिकांमध्ये दहशत पसरवित होता.

## पोलिस पाटील संघटनेचे तालुका अध्यक्ष समीर धोटे यांची गळफास घेऊन आत्महत्या

**समुद्रपूर :** तालुक्यातील सावंगी (झाडे ) येथील पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष समीर रामकृष्ण धोटे वय ४४ यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली. पत्नी ही मुलींच्या शिक्षणासाठी हिंगणघाट येथे राहते.काल दि. २९ ला रात्री खोलीत झोपायला गेले आणि सिलिंग पंख्याला फासी लावून आत्महत्या केल्याची घटना सकाळी उघडीस आली.आई वडील त्याला उठवायला गेले असता हा प्रकार उघडकीस आला. समीर यांच्या नावाने ३ एकर शेती असून बँक ऑफ महाराष्ट्रचे जवळपास तीन लाख रुपये कर्ज आहे.बँकेचे कर्मचारी सतत त्याला त्रास देत असल्याने व दोन वषार्पासून उत्पन्न झाले नसल्याने तसेच मालाला भाव नसल्याने त्यांनी हे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येते .त्याच्या मागे पत्नी,दोन मुले, आई-वडील असा मोठा आप्तपरिवार आहे .समीर धोटे च्या आत्महत्येनी सर्व पोलीस पाटील तसेच मित्रपरिवार मध्ये शोकाकुल वातावरण निर्माण झाले. घटनेचा पुढील तपास ठाणेदार संतोष शेगावकर यांच्या मार्गदर्शनात समुद्रपूर पोलिस करीत आहे.

## ८२ लाखांचा गुटखा पान मसाला नष्ट

**लोकशाही वार्ता/वर्धा**

सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखु, खर्रा इत्यादि अन्न पदाथार्चे उत्पादन, साठा, वितरण, वाहतुक किंवा विक्री यांवर महाराष्ट्र राज्यात बंदी घातलेली आहे.

अन्न व औषध प्रशासन विभाग, वर्धा कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी विविध ठिकाणी प्रतिबंधित अन्नपदार्थ जसे गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखु, खर्रा इत्यादि वर कारवाई करुन साठा जप्त करण्यात आला होता. सदर सर्व प्रकरणी विविध पोलीस ठाणेअंतर्गत संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदर गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखु, खर्रा इत्यादि अन्नपदार्थ मानवी सेवनास अपायकारक असल्याने सदर सर्व साठा नष्ट करण्याची कार्यवाही आज दि. ३१ जानेवारी रोजी करण्यात आली.

सदर प्रकरणात अन्न व औषध प्रशासन, वर्धा कार्यालयात जप्त करुन साठविलेला एकुण ८२ लाख ७४ हजार ४०३ रुपये किंमतीचा एकुण ८१४८ कि.ग्रॅ. वजनाचा साठा नष्ट करण्याची कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन केंद्र, नगर परिषद, इंझापुर, वर्धा येथे घेण्यात आली. या कार्यवाहीसाठी नगर परिषद, वर्धा यांची पुर्वपरवानगी व विशेष सहकार्य लाभले तसेच पोलीस प्रशासन, वर्धा व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांच्या सहकार्याने सदर कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडण्यात आली.सदर कार्यवाही कृष्णा जयपुरकर, सह आयुक्त (अन्न) (नागपूर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली या प्रशासनातील अधिकारी प्रफुल टोपले, सहायक आयुक्त (अन्न), रा. ब. यादव, अन्न सुरक्षा अधिकारी, वर्धा, संदीप नंदुरकर, प्रमुख लिपिक, अमित तृपकाने, नमुना सहायक व रमण बावणे, शिपाई यांचे उपस्थितीत करण्यात आली.

## प्रजासत्ताक दिनी अधिकारी आणि विद्यार्थ्यांचा सत्कार

### तहसील प्रांगणात तहसीलदारांनी केले सन्मानित



**लोकशाही वार्ता/देवळी**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी देवळी तहसील कार्यालयात झेंडावंदनाच्या नंतर गुणवंत विद्यार्थी तसेच कार्यात विशिष्ट कामगिरी केल्याबद्दल तहसीलदारांच्या मार्फत प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत अनुदान, वाटप माहिती, संकलन, शोध व बचाव कार्यात उत्तम कामगिरी केल्याबाबत प्रमाणपत्र देऊन खालील कर्मचारी व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम तहसीलच्या प्रांगणात विविध शाळांचे शालेय विद्यार्थी ,शिक्षक ,सन्माननीय जेष्ठ नागरिक, तरुण व विद्यार्थी यांच्यासमोर पार पडला. देवळीचे तहसीलदार समर्थ शिरसागर, नायब तहसीलदार आनंद देवकर पंचायत समितीचे बीडिओ लोखंडे, जाधव मॅडम, पत्रकार शेख सत्ता र, जब्बार तवर यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. ग्राम महसूल अधिकारी विजय जुनघरे , महसूल सेवक सतीश काठवाडे, जनता माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी क्षितिजा राजेश मुरकुटे हिला चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल तर वकृत्व स्पर्धेत अक्षदा विनायक भिसे यशवंत कन्या शाळा देवळी, रांगोळी स्पर्धेत रोशनी नागापुरे जावंदिया महाविद्यालय देवळी ,तर आर के महाविद्यालय पुलगाव येथील कोमल भोंडवे हिला पोस्टर्स स्पर्धेत, आणि बंटी चौधरी नगरपरिषद देवळी यांना निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र व चिन्ह देण्यात आले.

## शिक्षणासोबत विद्यार्थ्यांनी कला गुण जोपासावे - जितीन रहमान

### शालेय क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाचे बक्षीस वितरण




**लोकशाही वार्ता/वर्धा**

कुठल्याही स्पर्धेत यश अपयश महत्त्वाचे नसून सहभाग महत्त्वाचा आहे. क्रीडा व कलागुणातून शिक्षणासोबतच बुध्दिमत्तेत वाढ होण्यासोबतच आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत होते, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात केले.

जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा क्रीडा संकल येथे जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या महोत्सवाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी प्राथमिक नितू गावंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज.पराडकर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. मंगेश घोगरे, आर्वी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सुनीता मरस्कोल्हे आदी मंचावर उपस्थिती होते.

दैनंदिन जीवनात शिक्षणासोबतच सुदृढ आरोग्य असणे तेवढेच महत्त्वाचे असून आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी क्रीडा व कलागुण विद्यार्थ्यांच्या अंगी असणे आवश्यक आहे. या क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवातुन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळेल असे पुढे बोलतांना जितीन रहमान म्हणाले. गेल्या तीन दिवसापासुन सरू असलेल्या शालेय क्रिडा स्पर्धेत जिल्ह्यातील वर्धा, आर्वी, कारंजा, आष्टी, देवळी, हिंगणघाट, समुद्रूपूर, व सेलू या पंचायत समिती मधील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदविला. या महोत्सवात प्रथम, व्दितीय तृतीय क्रमांक पटकविलेल्या पंचायत समिती निहाय शाळेच्या संघांना जितीन रहमान यांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले. सर्वसाधारण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीसाठी आर्वी पंचायत समिती चषक देऊन गौरविण्यात आले.

# जिल्हा नियोजनचा ४१६.५८ कोटींचा प्रारूप आराखडा मंजूर

### योजनांची जनजागृती करण्यावर भर द्या नवीन कारागृह इमारत प्रस्ताव तयार करा



**लोकशाही वार्ता/वर्धा**

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेसाठी शासनाने २०७.२२ कोटींची वित्तीय मर्यादा दिली होती. यंत्रणांच्या २०९.३६ कोटींच्या वाढीव मागणीसह आजच्या बैठकीत ४१६.५८ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी प्रदान करण्यात आली. राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत जास्तीत जास्त वाढीव निधी मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा नियोजन समितीचा निधी वेळेत खर्च करतांनाच कामाची गुणवत्ता राखावी अशा सूचना पालकमंत्र्यांनी केल्या.

खासदार अमर काळे, आमदार सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, समीर कुणावार, सुमित वानखेडे, राजेश बकाने, जिल्हाधिकारी श्रीमती वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उपवनसंरक्षक हरविर सिंग, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजूरवार व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या विविध योजनांची जनजागृती करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज परतावा योजनेचा मेळावा घेऊन शेतक?यांना योजना समजावून सांगावी व लाभ मिळवून द्यावा असे ते म्हणाले. मासेमारी साधने या योजनेअंतर्गत सर्व आमदारांसोबत बैठक घेऊन नियोजन करावे असे निर्देश त्यांनी दिले. वन्यप्राण्यांमुळे होणा?या शेत नुकसानभरपाई बाबतीतही जनजागृती करण्यात यावी असे ते म्हणाले. नवीन जिल्हा कारागृह निर्मितीचा प्रस्ताव तयार करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

पीएमश्री व सीएमश्री शाळांसोबतच आदर्श शाळा व मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या योजनेत वर्धा जिल्हा सर्वात पुढे राहील यासाठी शिक्षण विभागाने नियोजन करावे सोबतच शाळा निहाय क्रीडांगण योजनेचे प्रस्ताव शासनास सादर करुन शाळेतील मैदानावर मुलांना खेळण्यासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दयाव्या असे ते म्हणाले. या बैठकीत जिल्ह्यातील क व ब वर्ग तीर्थक्षेत्र स्थळांना मंजुरी देण्यात आली.

ॲड. अभिजित वंजारी, आ. सुधाकर अडबाले, आ. समीर कुणावार, आ. राजेश बकाने, आ. सुमीत वानखेडे यांनी आरोग्य, शिक्षण, ऊर्जा, रुग्णवाहिका, वन्यप्राण्यांमुळे होणारे शेतीचे नुकसान व मासेमारी साधने योजना आदी विषयावर प्रश्न विचारले.

सन २०२४-२५ या वर्षाच्या मंजूर आराखड्याच्या तुलनेत सन २०२५-२६ यावर्षीच्या वित्तीय मयार्देत १०५.७८ कोटींची तूट आहे. २०२४-२५ मध्ये ३१३ कोटीचा आराखडा मंजूर होता. सन २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी सर्व यंत्रणांनी ९५२.४२ कोटी निधीची मागणी केली. शासनाकडून दिलेली वित्तीय मर्यादा आणि यंत्रणेची मागणी यामध्ये ७४५.२० कोटींची तफावत आहे. यावर बैठकीत सविस्तर चर्चा करून यंत्रणांची २०९.३६ कोटी रुपयांची वाढीव मागणीसह ४१६.५८ कोटींचा प्रारूप आराखडा बैठकीत मंजूर करण्यात आला. मंजूर करण्यात आला. वाढीव निधी मंजूर करण्यासाठी राज्यस्तरीय बैठकीत पाठपुरावा केला जाणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले.सन २०२५-२६ या आर्थिक वषार्साठी सर्वसाधारण योजना २०७.२२ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४४ कोटी, आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजना १७.९८ कोटी रुपयांची वित्तीय मयार्दा शासनाकडून देण्यात आली आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वषार्साठी सर्वसाधारण योजनेत शासनाने २०७.२२ कोटी रुपयांची कमाल वित्तीय मयार्दा घालून दिली होती. यात नाविन्यपूर्ण योजना, शाश्वत विकास ध्येय व सनियंत्रण व डाटा एन्ट्री १०.३६ कोटी, महिला व बाल कल्याण ६.२२ कोटी, गड किल्ले, मंदिर व महत्त्वाची स्मारके संवर्धन ६.२२ कोटी, पोलीस विभागाकरिता ६.२२ कोटी व शिक्षण विभागासाठी १०.३६ कोटी असा एकूण ३९.३८ कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याचे शासनाने निर्देश आहेत. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी कार्यान्वित यंत्रणांची २०९.३६ कोटी रुपयांची वाढीव मागणी यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत ०५ जानेवारी, २०२४ च्या जिल्हा नियोजन समिती बैठकीचे इतीवृत्त कायम करणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत माहे मार्च, २०२४ अखेरच्या खर्चास मंजुरी (सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपक्षेत्रा बाहेरील उपयोजना) जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत माहे जानेवारी, २०२५ अखेरच्या खर्चाचा आढावा. (सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपक्षेत्रा बाहेरील उपयोजना). जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ प्रारूप आराखडयास मंजूरी प्रदान करणे. (सर्वसाधारण योजना. अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपक्षेत्रा बाहेरील उपयोजना) अध्यक्षांचे परवानगीने वेळवर आलेल्या विषयावर चर्चा करण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले तर संचालन व आभार जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुध्द राजुरवार यांनी मानले.

## तालुका क्रीडा स्पर्धेत आजनसरा शाळेच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी



**लोकशाही वार्ता/वर्धा**

आजनसरा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी हिंगणघाट तालुका क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत वडनेर बिटाला चॅम्पियन ट्रॉफी मिळवून देण्यात मोलाची कामगिरी केली.

विद्यार्थ्यांच्या खेळांना व कलागुणांना वाव मिळावा यासाठी तालुकास्तरावर आयोजन केले होते .या स्पर्धेत नाटिका, नाट्यछटा, नृत्य या तीनही सांस्कृतीक स्पर्धेमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सोबतच१०० मीटर, २०० मीटर दौड स्पर्धेत कु.चेतना प्रमोद रेवतकर, कु.वेदिका अरुण कामडी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. कबड्डी प्राथमिक गट मुली द्वितीय क्रमांक, गोळाफेक नागेश्वरी गोविंद ठाकरे, नैतिक हिरामण पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. चॅम्पियनट्रॉफीसाठी लागणाऱ्या गुणांपैकी ३१ गुण एकट्या आजनसरा शाळेने मिळवून दिले. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक गजानन भुते,शिक्षक प्रदीप सुपारे , महेंद्र पर्बत, शिक्षिका ममता कांबळे, विपुला ठाकरे, यांचे मार्गदर्शन लाभले. यशासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप तिजारे, उपाध्यक्षा शुभांगी रवींद्र सुरकार व समस्त सदस्य मंजुषा बंडू गाढवे, कल्पना अरुण कामडी, दिलीप ढवळे, संजीवनी नरेश आष्टणकर, वाल्मिक गाढवे, रामप्रसाद गुप्ता, रत्नमाला विठ्ठल नागोसे, संध्या भोजराज कोसुरकर तसेच संत भोजाजी महाराज देवस्थान कमिटी व समस्त ग्रामस्थांनी कौतुक केले.

लोकशाही वार्ता
# अकोला-वाशीम
गुड मॉर्निंग
नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/१०
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन उद्या

**वाशीम :** फेब्रुवारी महिन्यातील लोकशाही दिन ३ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह लोकशाही दिनामध्ये १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

# बचत गटांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ

## पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची ग्वाही

**लोकशाही वार्ता/अकोला**

वऱ्हाडी जत्रा सरस प्रदर्शन हे वऱ्हाडच्या सांस्कृतिक समृद्धीचे दर्शन घडविणारे असून, खेड्यापाड्यातील महिलाभगिनींच्या बचत गटांना या माध्यमातून व्यासपीठ मिळाले आहे. जिल्ह्यात बचत गटांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी येथे दिली.

ग्रामविकास व पंचायतराज विभाग, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातर्फे लालबहादूर शास्त्री क्रीडांगणावर वऱ्हाडची संस्कृती, खाद्यपदार्थ, ग्रामजीवन यांचे दर्शन घडविणाऱ्या वऱ्हाडी जत्रा- २०२५ उपक्रमाचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते झाला. जिल्हाधिकारी अजित कुंभार, आमदार रणधीर सावरकर, वसंत



खंडेलवाल, अमोल मिटकरी, जिल्हाधिकारी अजित कुंभार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, महापालिका आयुक्त सुनील लहाने, ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक मनोज जाधव, जिल्हा अभियान व्यवस्थापक नरेंद्र काकड आदी उपस्थित होते.

ग्रामविकास व पंचायतराज विभाग उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, अकोला आयोजित वऱ्हाडी जत्रा -२०२५ या मिनी सरस महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते झाले.

या उपक्रमात जिल्ह्यातील अनेक महिला स्वयंसहाय्यता गटांनी सहभागी होऊन विविध उत्पादने जत्रेत प्रदर्शित केली आहेत. पालकमंत्र्यांनी विविध कक्षांना भेट देऊन महिलाभगिनींशी संवादही साधला. जिल्ह्यातील बचत गटांनी शाश्वत विकासाकडे वाटचाल करावी. बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ मिळण्यासाठी महिला बचत गट उत्पादनांचे विक्री भवन व्हावे. त्यासाठी निश्चित प्रयत्न करू, असे पालकमंत्र्यांनीही यावेळी सांगितले. उपक्रमात बचत गटांची उत्पादने, खाद्यपदार्थ, वस्तू यांची दालने असून, रोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. शास्त्री क्रीडांगणावर ४ फेब्रुवारीपर्यंत स. ९ ते रात्री १० या वेळेत सर्वांसाठी प्रदर्शन खुले आहे.

# हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यात चार शेळ्यांचा मृत्यू, एक जखमी



या प्रकरणी वनविभागाने घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. हा प्रकार हा लांडगा किंवा अन्य प्राण्यांने केला असल्याचे समजले. रिसोड तालुक्यात सध्या बिबट्या कुठेही नसून शेतकऱ्यांनी, नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही.

**– हनुमान साठे**
वनरक्षक अधिकारी, रिसोड

**लोकशाही वार्ता/रिसोड**

हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यात चार शेळ्याचा मृत्यू तर एक जखमी झाल्याची घटना रिसोड करडा मार्गावर बिबखेड शेत शिवारामध्ये वसंता देवबा मोरे यांच्या शेतात घडली. याबाबत माहिती अशी की, रिसोड येथील वसंता देवबा मोरे यांची रिसोड करडा मार्गावर बिबखेड शिवारामध्ये शेती असून शेतीसह जोडधंदा म्हणून त्यांच्याकडे पशुपालन व्यवसाय आहे.

त्यांच्याकडे १५ ते २० शेळ्या असून दैनंदिनप्रमाणे ते रात्री आठ ते साडेआठ वाजताच्यादरम्यान आपली सर्व कामे आटपून जनावरांना चारापाणी करून आपल्या घराकडे निघून गेले. ३१ जानेवारी रोजी सकाळी जेव्हा ते आपल्या शेतामध्ये आले असता त्यांना हा सदर प्रकार दिसून आला. हा हल्ला बिबट्याने केला असल्याचे शेतकरी वसंता देवबा मोरे यांचे म्हणणे असून शेळ्यांसाठी लावण्यात आलेल्या टीन शेडची उंची व यामध्ये चांगलाच अंतर असून अन्य कोणताही प्राणी उडी मारून शेडमध्ये शिरू शकत नाही असा अंदाज असल्याचे मोरे यांनी सांगितले.

बिबट्याने रात्रीच्या सुमारस चारही शेळ्यांचा फडशा पाडला असल्याचे मोरे यांनी सांगितले. या घटनेमध्ये एकूण एक लाख रुपयाचे नुकसान झाले असून सदर घटनेचा पंचनामा करून योग्य तो मोबदला देण्यात यावा अशी मागणीही शेतकरी मोरे यांनी केली आहे. या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून विशेष म्हणजे पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. रात्री अपरात्री केव्हाही घटना घडू शकते अशी शेतकऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली असून वन विभागाने सदर प्राणीचा शोध घेऊन त्यास जेरबंद करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# मौनी अमावास्यानिमित्त सुंदरकांड पठण कार्यक्रम



**लोकशाही वार्ता/वाशीम**

सामाजिक आणि धार्मिक उपक्रमामध्ये नियमित अग्रेसर असलेले वाशीम येथील माहेश्वरी महिला मंडळ, विदर्भ प्रादेशिक महिला मंडळ, माहेश्वरी सत्संग महिला मंडळ तसेच माहेश्वरी बहु मंडळद्वारा आयोजित सुंदरकांड पठण कार्यक्रम वाशीम येथील महेश भवन येथे पवित्र महाकुंभ पर्व मौनी अमावास्या निमित्त दुपारी ३ वाजता महेश भवन येथे संपन्न झाला. या धार्मिक आयोजनामध्ये सर्व माहेश्वरी महिलांनी तसेच मंडळाचे पदाधिकारी सहभागी होते.

# माहेश्वरी युवक-युवती परिचय संमेलन ८ व ९ मार्चला

**लोकशाही वार्ता/वाशीम**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या श्री माहेश्वरी सामूहिक सेवा समितीच्यावतीने स्थानिक महेश भवन येथे माहेश्वरी समाज बांधव व संघटनेच्या आयोजित बैठकीला भव्य प्रतिसाद मिळाला. ८ व ९ मार्च रोजी अ.भा. माहेश्वरी युवक, युवती परिचय संमेलन अमरावती येथील बडनेरा रोड, श्री महेश भवन येथे आयोजित करण्यात आले आहे.

या आयोजनामध्ये जिल्ह्यातील युवा, युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संयोजक बंकटलाल राठी यांनी यावेळी केली. स्थानिक



महेश भवन येथे पार पडलेल्या बैठकीत संयोजक बंकटलाल राठी, घनश्याम नावंदर, सतीष जाजू, मानकलाल सोमाणी, मोहित सारडा, संजय जाजू, समाजाचे जेष्ठ मुलचंद करवा, रमेशचंद्र लढ्ढा, प्रदेश संयुक्त मंत्री शिवलाल भुतडा, जिल्हाध्यक्ष कैलास मुंदडा, सचिव सुनील गट्टाणी, उद्योजक पवन मंत्री, श्रीराम राठी, प्रदेश सदस्य निलेश सोमाणी, सुरेश करवा, डॉ. संतोष करवा, सचिन राठी, ललित राठी, युवा संघटन जिल्हाध्यक्ष डॉ. रोशन बंग, चंद्रशेखर राठी, राजेश बंग, डॉ. राजकुमार करवा, संतोष कासट, विजय गट्टाणी समवेत समाज बांधव उपस्थित होते. यावेळी अधिवेशनाची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

# शिरपूर येथील स्काऊट पथक तामिळनाडूतील जांबोरीला रवाना

**लोकशाही वार्ता/वाशीम**

शिरपूर जैन भारत स्काऊट आणि गाईड संस्थेच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त जय बजरंग विद्यालय, सुकांडा व कोंडबातात्या ढवळे विद्यालय, शिरपूर तालुका मालेगाव येथील दोन पथके तामिळनाडूतील जांबोरीला रवाना झाली. भारत स्काऊट आणि गाईड राष्ट्रीय कार्यालयाच्या वतीने डायमंड जुबली जांबोरी येथे आयोजित केलेली आहे. सदर जांबोरीमध्ये वाशीम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील जय बजरंग विद्यालय, सुकांडा येथील स्काऊटर प्रमोद राठोड व कै. कोंडबातात्या ढवळे विद्यालय, शिरपूर येथील स्काऊटर रामेश्वर सर्जेराव यांच्यासह सदर शाळेतील १६ स्काऊट सहभाग घेण्यासाठी रवाना झाले आहेत.

स्काऊट गाईड जांबोरी हे शालेय विद्यार्थ्यातील सुप्त गुणांना वाव देणारे मुक्त व्यासपीठ आहे. स्वावलंबन, शिस्त, परस्पर सहकार्य भावना व निसर्गाच्या सानिध्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार आवडीनुसार विविध साहस खेळ खेळण्याची संधी मिळते. संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्याची त्यांना अनोखी भेट आहे. अशा जांबोरीमधून विद्यार्थ्यांच्या अंगी नेतृत्व गुण वाढीस लागून तो चांगला नागरिक घडतो. भावी जीवनात कुठल्याही घटनेस तो धैर्याने समोर जाण्यास सक्षम होतो. त्यामुळे अशा विविध मेळावे जांबोरी येथे एक वेगळे शिक्षण सात दिवसात अनुभवास मिळते जे की वर्षभर वर्गाच्या चार भिंतीत घेता येत नाही असं प्रत्यक्ष अनुभवातुन शिक्षण त्यांना या जांबोरी येथून सहज मिळते.

# करियर कट्टा जिल्हास्तरीय स्पर्धेत राजस्थान महाविद्यालयाची भरारी

**लोकशाही वार्ता/वाशीम**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने, विद्यार्थी हिताच्या दृष्टीने नोंदणी आणि करिअर संदर्भात माहिती पुरवणाऱ्या महाविद्यालयाची करिअर कट्टा २०२४- २५च्या स्पर्धेचा जिल्हास्तरीय निकाल नुकताच जाहीर झाला.

त्यामध्ये उत्कृष्ट प्राचार्य म्हणून राजस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर यांना द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. या स्पर्धेत प्रत्येक तालुक्यातून तीन उत्कृष्ट समन्वयकांची सुद्धा निवड केल्या जाते. त्यामध्ये रसायनशास्त्र विभागाचे प्रा. मनोज मोरे यांना द्वितीय उत्कृष्ट समन्वयकांचा पारितोषिक प्राप्त झालेला आहे.

तर महाविद्यालयीन स्तरावरील उत्कृष्ट समन्वयकांमध्ये वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. गणेश बळी यांना द्वितीय पारितोषिक प्राप्त झाला आहे. या प्राप्त झालेल्या पारितोषिकामुळे महाविद्यालयाच्या यशात आणखी भर पडली असून सर्वत्र कौतुक होत आहे.. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी टप्पा वाढीसाठी दिले आमदारांना निवेदन

**लोकशाही वार्ता/कारंजा लाड**

शहरातील तसेच तालुक्यातील खासगी प्राथमिक माध्यमिक अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी यांनी आमदार सई प्रकाश डाहके यांच्या निवासस्थानी ३१ जानेवारी रोजी टप्पा अनुदान वाढीकरिता मुख्यमंत्री यांना शिफारस करण्याकरिता आमदार सई प्रकाश डहाके यांना निवेदन देण्यात आले. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी निघालेल्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा पुढील टप्पा मिळावा याकरिता निवेदन देण्यात आले. येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यासाठी मुख्यमंत्री तसेच राज्याचे अर्थ वित्तमंत्री यांना आपल्यातर्फे शिफारस करावी याकरिता निवेदन देण्यात आले. शिफारशीचे पत्र मिळावे, याकरिता कारंजा तालुक्यातील सर्व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे स्वाक्षरीचे निवेदन देण्यात आले. निवेदन देण्याकरिता अनिल बैस, सतीश गायधनी, किरण चौधरी, संजय राऊत, आतिक शेख, मनोज खडसे, रोशन मिसाल, अमित करडे, निलेश पारे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# राजस्थान महाविद्यालयाला मैदानी स्पर्धांमध्ये सुवर्णपदक

**लोकशाही वार्ता/वाशीम**

नेहरू युवा केंद्र, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय, भारत सरकार व जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा कार्यालय, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा मैदानावर विविध तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये राजस्थान महाविद्यालय, वाशीम येथील विद्यार्थ्यांनी गोळा फेक, धावणे अशा विविध स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्या स्पर्धेमध्ये १०० मीटर धावणे प्रकारात राजस्थान महाविद्यालयाची पूजा शेळके हिने भाग घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आणि सुवर्णपदक पटकावले. तसेच अविनाश भोकरे या विद्यार्थ्याने सुद्धा १०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक पटकाविला.

तसेच गोळा फेक या क्रीडा प्रकारामध्ये दीपाली दत्ता भोयर हिने द्वितीय क्रमांक तर कोमल काशिनाथ वाणी हिने तृतीय क्रमांक मिळविला. त्यामुळे जिल्हा क्रीडा मैदानावर जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. वरील सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. राजस्थान महाविद्यालयातील विद्यार्थी सदैव विविध स्पर्धेमध्ये अग्रेसर असतात. यापूर्वी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विविध खेळ प्रकारात तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागस्तरावर सुद्धा आमच्या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळविले आहे. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या स्पर्धेसाठी प्रभारी क्रीडा प्रशिक्षक डॉ. पुरुषोत्तम वानखेडे, प्रा.पुरुषोत्तम कव्हर व सर्व प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

तसेच राजस्थान शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ठाकूरदास मालाणी, माजी अध्यक्षा व विद्यमान सदस्या शीला राठी, सचिव सुधीर राठी व प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अस्थीविसर्जनाच्या राखेत वृक्षारोपण

**लोकशाही वार्ता/वाशीम**

करंजी लहाने येथील रहिवाशी स्व. यादवराव नामदेव लहाने यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या अस्थीविसर्जनाचा कार्यक्रम गावातील स्मशान भूमीत ठेवण्यात आला होता. त्यांच्या अस्थिविसर्जनाच्या राखेत स्मशानभूमीत त्यांचे पुत्र व वनकामगार जिल्हाध्यक्ष वाशीम राजू पाटील लहाने, मोठे बंधू संतोष लहाने व धाकटे बंधू सुरेश उर्फ मुन्ना लहाने यांनी बेलाचे तसेच आंब्याच्या वृक्षांची लागवड केली. इतरांनी सुद्धा अशाच प्रकारचे वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

राजू पाटील लहाने हे मागील २० वर्षापासून वनकामगार म्हणून काम करत आहेत. आतापर्यंत त्यांनी हजारो वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले आहे. सद्या ते वनकामगार जिल्हाध्यक्ष वाशिम ची यशस्वी धुरा सांभाळत आहेत. वडिलांच्या अस्थीविसर्जनाच्या राखेत वृक्षारोपण करून त्यांनी ते वडिलांच्या रूपात जगविण्याचा संकल्प केला आहे.

त्यांचा हा वृक्षलागवड चा उपक्रम समाजासाठी व पर्यावरण प्रेमी साठी प्रेरणादायी व अनुकरणीय ठरत आहे. प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करावे जेणेकरून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मदत होईल व ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अर्जुन लहाने, रामदास लहाने, संतोष



लहाने, राजू लहाने, सुरेश उर्फ मुन्ना लहाने, सुभाष महाराज लहाने, भागवत लहाने, वसंता लहाने, गोपाल लहाने, रोशन लहाने, संजय बोरकर, संदीप लहाने उपस्थित होते.

# सुंदर कांड व खाटू श्याम भजन कार्यक्रमाला भक्तांचा प्रतिसाद

**लोकशाही वार्ता/वाशीम**

येथील पवन ॲग्रो इंडस्ट्रीज एमआयडीसी परिसर हिंगोली रोड येथे संगीतमय सुंदर कांड तसेच खाटू श्यामजी चे भजनमाला भक्तिमय वातावरणात पार पडला सुंदरकांड गायक अमरावती येथील श्री बजरंग सुंदर कांड मंडळाच्या ग्रुपने सादर केले. खाटूश्यामजीचे भजन सुप्रसिद्ध गायक जय शर्मा दिग्रस यांनी आपल्या सुमधुर वाणीतून गायले. तद्नंतर महाप्रसादाचे आयोजन सुद्धा करण्यात आले. प्रसिद्ध व्यवसायी मालपाणी परिवार पवन ॲग्रो इंडस्ट्रीज प्रॉडक्टचे संचालक मालपाणी परिवारच्यावतीने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दामोदर दिलीप कुमार मालपाणी, सुनील कुमार



मालपाणी, राजकुमार मालपाणी, शहरातील अनेक भक्तांनी लाभ घेतला.

ताराबाई मालपाणी यांच्या कुटुंबातील दिलीप, सुनील, राजेश और पद्मा बालाप्रसाद झवर, ज्योती, शिल्पा, जयश्री, पल्लवी विशाल, कोमल, गोपाल, मानसी, पवन मालपाणी श्रीयांका, अभिषेक मालपाणी, आशुतोष हर्षल अंकित, रिया, राम मिथिलेश वीरा, मिष्टी मालपाणी, पायल प्रपन्न, काबरा, पूजा, प्रणव, उपस्थित होते. ताराबाई मालपाणी कांताबाई मालपाणी यशोदाबाई मालपाणी दामोदर मालपाणी यांचा सुवर्णसिडीचा कार्यक्रम रामा मिथिलेश या बालकांच्या हाताने पार पाडला. या धार्मिक, कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये मालपाणी परिवाराचे नातेवाईक तसेच सर्व वाशीम शहरातील माहेश्वरी समाज उपस्थित होता.

# स्काऊट-गाईड जिल्हा मेळाव्याचे वढवी येथे उद्घाटन

**लोकशाही वार्ता/कारंजा लाड**

भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय वाशीम तसेच शिक्षण विभाग जिल्हा परिषद वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वा स्काऊट गाईड जिल्हा मेळावा आप्पास्वामी विद्यालय, वढवी. ता. कारंजा येथे संपन्न झाला. या मेळाव्यात जिल्हातील एकूण ५५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. स्काऊट मेळावा प्रमुख गोपाल काकड तर गाईड विभागाच्या मेळावा प्रमुख इंदिरा राणे व मेळावा संयोजक आप्पास्वामी विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुश शेंडोकार हे होते.

मेळाव्याचे उद्घाटन शिक्षक आमदार किरणभाऊ सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी प्राथमित तथा जिल्हा मुख्य आयुक्त विठ्ठल भुसारे यांनी भुषविले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रशासन अधिकारी तथा सहा. जिल्हा आयुक्त स्काऊट निलेश देवकते, ज्ञानेश्वर शेंडोकार सचिव संत झोलेबाबा व्यायाम व क्रीडा युवक कल्याण व बहुउद्देशीय विकास मंडळ वढवी, रजनीताई धानोरकर माजी सहा.

राज्य आयुक्त गाईड, विनोद नरवाडे जिल्हा अध्यक्ष मुख्याध्यापक संघ तथा सहा. जिल्हा आयुक्त स्काऊट, विजय भड विदर्भ विज्ञान मंडळाचे सचिव तथा मुख्याध्यापक बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डी, भागवत घुगे प्राचार्य ज्ञानेश्वर विद्यालय मांडवा, पुष्पाताई इंगोले सरपंच वढवी, तेजस्विनी लेहरकर, जिल्हा संघटक वैशाली घोम, जिल्हा संघटक मनिषा ढोके उपस्थित होते.



शिक्षक आमदार किरणभाऊ सरनाईक यांनी भाषणात स्काऊट गाईडचे विद्यार्थी जीवनातील महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. रजनीताई धानोरकर यांनी आपल्या मनोगतात स्काऊट म्हणजे काय आणि स्काऊटचा विद्यार्थी जीवनातील उपयोग व महत्त्व विशद केले. अध्यक्ष भाषणात शिक्षणाधिकारी विठ्ठलराव भुसारे यांनी स्काऊट गाईड चळवळीतून विद्यार्थ्यांचा सर्वांनी विकास कसा होतो याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कविता सोनोने, प्रास्ताविक वैशाली घोम जिल्हा संघटक व आभार अंकुश शेंडोकार मुख्याध्यापक यांनी मानले.

शेकोटी कार्यक्रमाचे उद्घाटन सहाय्यक संचालक दीपाली हिरोळे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक बोरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी वाशिम भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालयातील जिल्हा संघटक वैशाली घोम, जिल्हा संघटक गाईड मनीषा ढोके, स्काऊटर गोपाल काकड, विष्णु बोबडे, सुभाष बलखंडे, सचिन चतरकर, निलेश मिसाळ, मंगेश महाजन, विनोद राजगुरू, रमेश घुगे, प्रफुल्ल गुजर, के.टी. शिंदे, श्रीमती अन्नपूर्णा कदम, रूपाली आरू, सदानंद सिरसाट, आप्पास्वामी विद्यालयातील शिक्षक स्काऊट मास्टर शेषराव लेहारकर, गोपाल शेंडोकार, मुंगणकर, गाईड कॅप्टन कविता सोनवणे व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मुख्याध्यापक संघ जिल्हातील सर्व स्काऊटर व गाईडर उपस्थित होते.

## महात्मा गांधी खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माते - डॉ. म्हस्के

**लोकशाही वार्ता/अमरावती**

आधुनिक भारताच्या इतिहासावर खऱ्या अर्थाने प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केल्यास महात्मा गांधी यांचेच नाव घ्यावे लागेल. कारण अखंड भारतासाठी अविरतपणे ते संघर्षशील राहिले, असे विचार एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन या अभ्यासक्रमाचे प्रा. डॉ. वैभव म्हस्के यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील, आजीवन अध्ययन व विस्तार विभागात हुतात्मा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.




लोकशाही वार्ता

# अमरावती

नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/११

## तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी नियुक्तीबाबत सूचना

**लोकशाही वार्ता/अमरावती**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, गर्ल्स हायस्कूल चौक, महिला व बालविकास भवन अमरावती अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात दोन महिन्यासाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष यामधील बाह्यक्षेत्र कार्यकर्ता २ पदे व डाटा एन्ट्री ऑपरेटर १ पद व रेल्वे चाईल्ड लाईन सुपरवायझर १ पद व केस वर्कर १ पद या रिक्त पदांसाठी मिशन वात्सल्य मार्गदर्शक सूचना व चाईल्ड हेल्पलाईन मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुदप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या पात्र उमेदवारांनी दि.३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर करावे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### दृष्टिक्षेप

## हिवरखेड येथे वाचन संकल्प उपक्रम



**लोकशाही वार्ता/हिवरखेड**

ग्राम वाचनालय हिवरखेड ता. मोर्शी, जि. अमरावती सार्वजनिक वाचनालयातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २५ पर्यंत राबविण्यात आला होता. या उपक्रमात गांवातील वाचक, बालवाचक,स्पर्धा परीक्षा वाचक, तसेंच शाळेतील विद्यार्थी यांनी या कालावधीत सामुहीक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा,ग्रंथ प्रदर्शनी व कथन स्पर्धा, ग्रंथदिंडी या सर्व कार्यक्रमात सहभाग घेऊन वाचनालया चा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम फार चांगल्याप्रकारे पार पडला त्या बद्यल त्यांना हिवरखेड ग्राम वाचनालय हिवरखेड यांचे तफे वाचक उपस्थीती प्रमाणपत्र वितरणहा कार्यक्रम,२६जानेवारी चे भारतीय प्रजासत्ताक दिन या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रविद्रंपंत उ. वासनकर , नंदकिशोर ना. जावरकर हिवरखेड तसेच वाचनालयाचे अध्यक्ष नानासाहेब रा.धरमकर सचिव, साहेबराव निंभेकर, कोषाध्यक्ष साहेबराव पाटील, यांचे शुभ हस्ते वितरीत करण्यात आले. या प्रसंगीं गांवातील निमंत्रीत नागरिक, वाचनालयाचे सर्व पदाधिकारी, तसेच ग्रंथपाल अनंतराव फांजे, लिपीक पंकज भडके वशिपाई भूषण बेलसरे. हे सर्वजण उपस्थित होते.

## कृष्णाबाई देशमुख विद्यालयात गांधी पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**लोकशाही वार्ता/अमरावती**

श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था तळवेल द्वारा संचालित मातोश्री कृष्णाबाई देशमुख विद्यालय प्रभू कॉलनी अमरावती या विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी हुतात्मा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक विनोद तिरमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून जेष्ठ शिक्षिका सौ.ज्योती झाडे (बिरे) ह्या होत्या. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक विनोद तिरमारे, पर्यवेक्षक अतुल देशमुख,सारिका वानखडे, रविंद्र सोळंके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापू जनाने करण्यात आली व्यासपीठा वरील उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सत्य,अहिंसा व असत्येय तसेच स्वच्छतेचे पुजारी महात्मा गांधी यांनी स्वतःची कामे स्वतःच करणे, स्वच्छता, स्वाव लंबन प्रामाणिकपणा निटनेटके पणा, एकमेकांना मदत करणे ही मूल्ये रूजविली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले. असे प्रतिपादन मुख्याध्यापक विनोद तिरमारे यांनी आपल्या भाषणात केले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना ज्योती झाडे म्हणाल्या की १९२० नंतर लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे महात्मा गांधींकडे आली त्यांनी अनेक लढे त्यासाठी उभारले. असहकार चळवळ, चले जाव आंदोलन अशा अनेक चळवळी उभ्या करून त्यांनी देश स्वातंत्र होण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. परंतु नथुराम गोडसे यांनी ३० जानेवारी १९४८ मध्ये त्यांना प्रार्थनेला जात असताना त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली.ते हुतात्मा झाले. म्हणून आजचा हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. असे त्यांनी यावेळी प्रतिपादन केले.या कार्यक्रमाचा शेवट महात्मा गांधी यांचे आवडते भजन वैष्णव जन तो या गीताने करण्यात आला.

# पारदर्शी, गतिमान प्रशासनाचा संकल्प करा-पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**लोकशाही वार्ता/अमरावती**

जिल्ह्याच्या विकासासाठी शाश्वत विकासाचे ध्येय, जिल्ह्याचा संकल्प आणि पायाभूत सुविधांवर भर दिला जाईल. यासाठी सर्वांनी गतिमान, पारदर्शी प्रशासनाचा संकल्प करावा. असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यात्र जिल्ह्याच्या विकासाला चालना देणारे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीत विविध विकासकामांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली, तसेच नाविण्यपूर्ण प्रकल्पांवरही चर्चा झाली. तसेच जिल्हा नियोजनचा निधी वेळेत खर्च होण्यासाठी सात दिवसांच्या आत प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. खासदार बळवंत वानखडे, आमदार किरण सरनाईक, सुलभा खोडके, रवी राणा, प्रवीण तायडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, राजेश वानखडे, केवलराम काळे, गजानन लवटे, प्रवीण पोटे पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के आदी यावेळी उपस्थित होते. बैठकीत प्रास्ताविकेत जिल्हाधिकारी कटियार यांनी जिल्ह्यात सुरु असलेल्या कामांची माहिती दिली.

बैठकीत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतर्गत सन २४/२५ मधील जानेवारीअखेर झालेल्या ३३०.७२ कोटी रुपयांच्या खर्चाला बैठकीत मान्यता देण्यात आली. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ५६.५५ कोटी रुपये, तर आदिवासी घटक कार्यक्रमासाठी ४०.९९ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली.वार्षिक नियोजन समितीच्या बैठकीमध्ये विविध विकासकामांना चालना देण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी २१.४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातून ८३ कामे पूर्ण होणार असून ४०.३१ किलोमीटर लांबीचे रस्ते तयार होतील. इतर जिल्हा मार्गांसाठी १४.१४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ज्यामुळे २८ किलोमीटर रस्त्यांची सुधारणा होईल. जिल्ह्यातील १४ नगरपालिका, नगरपंचायती आणि महानगरपालिकेच्या विकासासाठी ११.८३ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्युत विकासासाठी ३० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील ऊर्जा उपलब्धता सुनिश्चित होईल. प्राथमिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांसाठी निधी प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात आला आहे.यावेळी पुढील वर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या अर्थसंकल्पावरही बैठकीत चर्चा झाली. जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारणसाठी ४१७.७८ कोटी रुपये, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी १०२ कोटी रुपये, तर आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रमासाठी ११७.३८ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. सर्व कामे वेळेत आणि उच्च दजार्ची पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासकीय यंत्रणांना देण्यात आले आहेत.महानगरपालिका स्थानिक स्वराज्य केंद्र व राज्य शासनाच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था महत्त्वपूर्ण आहेत.

सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शहरात सर्वत्र लवकरच सीसीटीव्ही लावण्यात येतील. चिखलदरा स्कायवॉकच्या काम गतीने पूर्ण करण्यात येईल. मंजूर कामांवरील निधी ३१ मार्च २५ च्या आत खर्च करावा. जिल्हा शल्य चिकित्सा तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अचलपूर येथील आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी अहवाल सादर करावा. मेळघाटातील दुर्गम २२ गावांमध्ये वीज प्रश्न असल्याने याठिकाणी वीज पुरवठा सुरूळीत सुरू रहावा, यासाठी महावितरणने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.महापालिकेसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी मनपा आयुक्त यांनी इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेच्या शाळा अत्याधुनिक करण्यावर भर द्यावा. मनपा शाळा डिजिटल तसेच आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त व्हाव्यात यासाठी१६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात अला. शाळा, तसेच आरोग्य सेवेकडे विशेष लक्ष द्यावे, असे पालकमंत्री म्हणाले.आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत जिल्ह्यातील नदी, उपनद्या, नाले खोलीकरण करून पाणी जिरवण्यावर भर द्यावा. उपसा करताना निघालेली वाळू शासकीय इमारतीच्या बांधकामा साठी वापरावी. गाव तेथे स्मशानभूमी ही योजना प्रत्येक गावात असणे आवश्यक आहे. तसेच मोर्शी मतदारसंघातील वन्य प्राण्यांच्या बंदोबस्ताबाबत तोडगा काढण्यात येणार असल्याचे सांगितले.

## विस्तार अधिकारी मिलिंद ढुनुकले यांनी उपोषणकर्त्याचे उपोषण सोडले

### चौकशी करून कारवाई करण्याचे दिले आदेश



**लोकशाही वार्ता/येवदा**

दर्यापूर तालुक्यातील ग्राम सासन येथील व्यक्ती अमोल पडघमोड यांनी गावाच्या समस्येबाबत आंदोलन छेडले होते, परंतु आश्वासन देऊन सुद्धा दोषीवर कारवाई होत नसल्याने येथील नागरिक अमोल पडघमोड यांनी पुन्हा उपोषणाला सुरुवात करून अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले जोपर्यंत कारवाईला सुरुवात होणार नाही तोपर्यंत उपोषण सुरू राहील अशी मागणी केल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपोषण कार्यकर्ते स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांची मी तर समजून घेतली उपोषण कार्यकर्त्याला विश्वासात घेऊन अधिकाऱ्यांनी दखल घेऊन दिलेल्या तक्रारीमध्ये मुद्दे निहाय चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्याचे आदेश देऊन उपोषण कार्यकर्त्याला दिलासा दिला. २००७ ते २०१४ पर्यंत आठ नमुन्यात खोडतोड करून सरकारी रस्ता नावाने केला असून ज्या अधिकाऱ्याने हे काम केले त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करून निलंबित करण्यात यावे सरकारी शेती च्या रस्त्यावर ग्रा.प.ची कोणतीही परवानगी न घेता पक्के बांधकाम करून अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे अतिक्रमण हटविण्यात यावे शासकीय अनुदानामध्ये शेळ्या बकऱ्या करिता गोठे बांधणी करणाऱ्या व्यक्तींना तातडीने पैसे देण्यात यावे अशी मागणी करून आक्रमक भूमिका घेणाऱ्या आंदोलन कार्यकर्त्याची प्रशासनाला दखल घ्यावी लागली पंचायत समिती चे विस्तार अधिकारी मिलिंद ढुनुकुले यांनी या गांभीर्याची दखल घेऊन उपोषण कार्यकर्त्याची मागणी समिती स्थापन करून दोषीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर अधिकारी मिलिंद ठनुकले यांचे गावकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले उपोषण कार्यकत्यार्ला लिंबू पाणी देऊन उपोषण सोडण्यात यश आले.

## घुईखेड येथे श्री. संत बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळा

**लोकशाही वार्ता/चांदूर रेल्वे**

जे लोकं सदा भक्ती श्रद्धापूर्वक श्रीदेवी भागवताची कथा ऐकतात, त्यांना सिद्धी प्राप्त होते. म्हणून सर्वांनी हे पुराण श्रवण केले पाहिजे. जे लोकं एक क्षण जरी भक्तीपूर्वक याचं श्रवण करतील ते कधीच दुर्गतीला जात नाहीत. अमृताने फक्त एकच मनुष्य अमर होते, परंतु भागवताच्या कथा अमृताने संपूर्ण कूळ अजरामर होते असे मत संगीतमय देवी भागवत कथा प्रवक्ता ह.भ.प. संगिताताई करंजीकर यांनी आपल्या वाणीतुन व्यक्त केले. घुईखेड येथे श्री. संत बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळा सुरू असून या सप्ताहादरम्यान दररोज सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ वाजतापर्यंत भागवत कथा होत आहे.तर ह.भ. प. योगेश महाराज खवले, बुलढाणा यांची कीर्तन सेवा ही पार पडली. यावेळी बोलतांना योगेश महाराजांनी म्हटले की, सत्याचाच घरे नाम विठोबाचे बरे हा तुकाराम महाराजांचा चार चरणाचा अभंग सेवेकरिता घेतला. त्यामधून महाराजांनी सत्याचे महत्त्व व संतांचे महत्त्व सांगितले.

## नितीन हटवार शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख

**लोकशाही वार्ता/नांदगाव पेठ**

शिवसेना उबाठा गटाने पक्षांतर्गत बदल करून शिवसेनेला उभारी देण्याचा प्रयत्न केला आहे.शिवसेनेचे नेते माजी जि.प. सदस्य नितीन हटवार हे शिवसेनेच सक्रिय कार्यकर्ते असून पक्षाने नुकतीच त्यांना अमरावती तालुकाप्रमुख म्हणून जबाबदारी दिली आहे.या नियुक्तीमुळे शिवसैनिकांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे तर हटवार यांच्या माध्यमातून पक्षाला नवसंजीवनी सुद्धा मिळाली आहे. स्व. संजय बंड व माजी खा. अनंत गुढे यांच्या मार्गदर्शनात आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात करणारे नितीन हटवार यापूर्वी शिवसेनेचे विधानसभा संघटक, उपजिल्हा प्रमुख राहलेले असून पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी आजवर यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसमावेश तर कुठे अर्थ शून्य

## २०४७ मधील 'विकसित भारताचे' अर्थसंकल्पात प्रतिबिंब- डॉ.अनिल बोंडे



'सर्वे सुखिना संतु' चा संदेश देणाऱ्या २०२५ च्या अर्थसंकल्पात २०४७ मधील विकसित भारताचे प्रतिबिंब पाहायला मिळत आहे. या माध्यमातून सर्व समाज घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न केल्याचे दिसत असल्याने भारत आता थांबणार नाही, विकासाची अशीच अजिंक्य घोडदौड प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्राचे माजी कृषी मंत्री तथा भाजपचे राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी दिली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आज भारताचा २०२५ मधला अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाचे डॉ.बोंडे यांनी स्वागत केलं. बहुसंख्या असलेल्या मध्यमवर्गीयांना अपेक्षित असलेला मोठा दिलासा अर्थसंकल्पात मिळाला आहे. १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्यात आलेल आहे. शेतकरी, छोटे गुंतवणूकदार, लघुउद्योग या गोष्टीवर अर्थसंकल्पात जास्त भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण, लिथियम बॅटरी, टेलिव्हिजन, भ्रमणध्वनी, डिजिटल उपकरणांच्या किमती कमी करण्यावर भर देण्यात आलेला आहे. भविष्यातील २०४७ मधील विकसित भारताला अभिप्रेत असलेला डिजिटल इंडिया कसा घडवता येईल याचा प्रामुख्याने या अर्थसंकल्पात मागवा घेण्यात आलेला असल्याची माहिती राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी दिली आहे. शेतकरी, नारी, युवा गरीब कसा आत्मनिर्भर होईल याकडे प्रामुख्याने लक्ष देण्यात आले आहे. मध्यमवर्गीय नागरिकांना भारतात कसं सुखी करता येईल हे पाहणारा अर्थसंकल्प आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडला याचे मी स्वागत करतो, असेही अनिल बोंडे यांनी म्हटले आहे.

## देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या महाराष्ट्र राज्याला अर्थसंकल्पात फक्त भोपळा — माजी आ. यशोमती ठाकूर



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मांडलेला अर्थसंकल्प म्हणजे मुळातच आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार अशा पद्धतीचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे कुठलंही ठोस आर्थिक धोरण नसल्यामुळे निर्मला सीतारमन यांचा अर्थसंकल्प ही तसाच भरकटलेला आहे. मध्यमवगार्ला आयकरात सूट देण्याचा निर्णय फसवा असून महागाई कमी करण्यासाठी किंवा जीएसटी च्या माध्यमातून सुरू असलेला कर-दहशतवाद संपवण्यासाठी कुठलंही पाऊल यात उचललेलं नाही. लोकांच्या हातात पैसा खेळता राहील असा खोटा आशावाद दाखवण्यात आला आहे, मुळात हा पैसा जीएसटीच्या माध्यमातून काढून घेण्यात येणार आहे. आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांमध्ये जास्त लक्ष देणं आवश्यक होतं, परंतु या बजेटमध्ये त्यांना पुरेसं महत्त्व दिलं गेलेलं नाही. गरीब आणि मध्यमवर्गाच्या भल्यासाठी कुठल्याही योजना या अर्थसंकल्पात नाहीत. मनरेगा बाबत ही ठोस उपाययोजना नाहीत. सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार आणि लालफितशाही मुळे देशातील उद्योग संकटात आहे. अशा वेळी देशात निर्यातक्षम उत्पादनेच तयार होऊ शकत नाहीत. टक्केवारी ५० टक्केपेक्षा पुढे गेलेली आहे. त्यामुळे नियार्तीला चालना देण्यासाठी सरकारने केलेल्या घोषणा फोल असून भारतीय उद्योजक कुठल्याही विदेशी बाजारात स्पर्धेत टिकू शकत नाही ही आजची परिस्थिती आहे. आयकरातील सूट फसवी आहे, सरकारने महागाई कमी करावी. महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी कुठलाही ठोस उपाययोजना सरकारकडे नाही. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून बाहेर काढण्यासाठी सरकारने ठोस मदत केली पाहिजे. त्याचबरोबर, शेतीत तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी अधिक पावले उचलायला हवी होती, मात्र या सरकारकडे दूरदृष्टीचा अभाव आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी या बजेट मध्ये काहीही नाही, थातूर-मातूर उपाययोजनांमुळे बेरोजगारी कमी होणार नाही, याची सरकारलाही जाणीव आहे.महिला सशक्तीकरणावर या अर्थसंकल्पात भरीव काहीही नाही. या सरकारला महिलांची मते हवी आहेत, मात्र त्यांच्या कल्याणासाठी शाश्वत योजना आणायच्या नाहीत. महिलांमधील उद्योजकता वाढी साठी भरीव तरतूद करता आली असती मात्र, निर्मला सीतारमन यांनी ही संधी गमावली आहे. महाराष्ट्राला चालू योजनांमध्ये जुजबी निधी देऊन मोदी सरकारने महाराष्ट्राची बोळवण केली आहे. देशाचं ग्रोथ इंजिन असलेल्या या राज्याचं संपूर्ण अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांना नाव घ्यावे वाटू नये ही शोकांतिकाच आहे.


## अर्थसंकल्पात आकड्यांचा खेळ



देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ आकड्यांचा खेळ खेळण्यात आला आहे. विविध योजनांसाठी आकडे फुगविणाऱ्या निधीची घोषणा केली असली तरी देशाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला प्रत्यक्ष फायदा होईल अशी कोणत्याही भरीव योजनेची घोषणा करण्यात आली नाही. त्यामुळे नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. आरोग्य व शिक्षण या क्षेत्रासाठी भरीव तरतूद करणे आवश्यक असताना केंद्र सरकारने त्याकडे साफ दुर्लक्ष केले आणि फक्त घोषणांचा पाऊस पाडण्यात या सरकारने धन्यता मानली.

**- सुनील खराटे**
**जिल्हाप्रमुख,उबाठा, शिवसेना अमरावती**

## सुबत्तेच्या दिशेने भारताची वाटचाल



शेतकरी, कर्मचारी, मध्यमवर्गीय सर्वसामान्य माणसांना तसेच कॅन्सरच्या औषधांवरील कस्टम ड्युटी हटवण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात आहे आत्मनिर्भर भारताच्या मोहिमेला बळ देणारं आणि सर्व भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करतो, सितारामन यांनी मांडलेला अर्थसकल्प हा सर्व समावेशक अर्थसंकल्प असुन यामध्ये गरीब ,मध्यमवर्गीयासह सर्वच स्तरावरील लोकांचा सर्वसमावेशक विचार केला गेला आहे.

**- आ. प्रताप अडसड,**
**धामणगाव रेल्वे**

## देशाचा आर्थिक कणा मजबूत करणारा अर्थसंकल्प - आ. खोडके



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज १ फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात रोजगार, सूक्ष्म, मध्यम आणि लघू उद्योग, शेती, उत्पादन, आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण, ग्रामीण भागाचा विकास आणि संशोधन या क्षेत्रावर भर देण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात विकासासाठी १० व्यापक उपाययोजनांचा समावेश करण्यात आल्या आहेत. पंतप्रधान धनधान्य कृषी योजना राज्यांसोबत चालवली जाणार आहे. यात १०० जिल्ह्यांत ही योजना राबवणार असून सस्टेनेबल ॲग्रीकल्चरवर भर देण्यात येणार आहे. त्यामुळे १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. आत्मनिर्भर इन एडिबल ऑइल सीड्ससाठी केंद्र सरकार प्रयत्न करणार आहे. तर डाळी आणि खाद्यतेलात स्वयंपूर्णता आणून तूर, आणि मसूर वर विशेष लक्ष केंद्रित करून डाळींमध्ये स्वयंपूर्णतेसाठी ६ वर्षांचे अभियान राबवल्या जाणार आहे.अर्थसंक ल्पात बऱ्याच काही नवीन योजनांचा समावेश असल्याने हा अर्थ संकल्प देशाचा आर्थिक कणा अधिक मजबूत करणारा असून सर्व सामान्य नागरिकांसह शेतकरी, व्यापारी, लघु उद्योजक, मध्यमव र्गीय, नोकरदार व गुंतवणूकदार यांना मोठा दिलासा देणार अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया अमरावतीच्या आ. सुलभा संजय खोडके यांनी व्यक्त केली आहे.

## शेतकऱ्यांचा भ्रमनिराश करणारा अर्थसंकल्प !



भारत कृषिप्रधान देश आहे, मात्र या कृषिप्रधान देशात कृषिक्षेत्राचे हब बनविण्याऐवजी पर्यावरणपूरक खेळण्यांचा हब बनविण्याच्या घोषणा होतात ही शोकांतिका आहे. केंद्र सरकारचा शेती क्षेत्राबाबतचा दृष्टिकोन यामधून स्पष्टपणे दिसून येतो. वास्तविक पाहता आजच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी किसान क्रेडिट कार्डची कर्जमयार्दा वाढविली, डाळींच्या बाबतीत देश आत्मनिर्भर करण्याची घोषणा केली. धनधान्य कृषी योजनेची घोषणा केली. मात्र हे सर्व करत असताना, सिंचन तसेच पायाभूत सुविधांची कोणतीच घोषणा केली नाही" तसेच ते"खते, बि-बियाणे, किटकनाशके, शेती औजारे यावरती ६ टक्क्यांपासून ते ३० टक्गक्यपर्यंत जीएसटी लावण्यात आलेली आहे. यामधून जीएसटी करामध्ये सवलत देवून शेती व्यवसायाला बुस्टर डोस देण्याची गरज होती. एकीकडे वाढलेली महागाई, नैसर्गिक आपत्ती, केंद्र सरकारचे आयात निर्यातीबाबतचे अस्थिर धोरण, पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे देशभरातील शेतकरी पिचलेला आहे.

**- देवेंद्र भुयार,**
**माजी आमदार**
**मोर्शी विधानसभा**

## पाटणबोरी येथे पाणी टाकीचे काम सुरू

**लोकशाही वार्ता/पाटणबोरी :** येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय यवतमाळ अंतर्गत पाण्याच्या फिल्टर टाकीचे काम मंजूर झाले आहे. २६ जानेवारी रोजी सरपंच दीपाली सुरावार,उपसरपंच विमल मंदुलवार सदस्य यांच्या उपस्थित टाकीचे भूमिपूजन करण्यात आले. सन २०१८ ला पाणी पुरवठा योजना मंजूर झाली होती. पाण्याच्या स्त्रोत कुठून अनायचा याचा सर्व्हे करण्यात आला होता. सायखेडा धरण ते पाटण बोरी पर्यंत पाईपलाईन काम पूर्ण झाले असून आज खोदकाम सुरू करण्यात आले आहे. गावात काही प्रमाणात पाणी टंचाई असल्याने प्रत्येक घरी नळ योजनेअंतर्गत नळ कनेक्शन देण्यात येणार आहे.


गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# यवतमाळ

नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/१२


## ४ फेब्रुवारी रोजी सामूहिक सूर्यनमस्कार

**यवतमाळ :** मंगळवारी ६.३० वाजता सामूहिक सूर्यनमस्कार घालण्याची कार्यक्रम यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक गार्डन रोड मुख्य इमारतीच्या छतावर समंत्र सूर्यनमस्कार घालण्याचे आयोजन करण्यात आले आहे. येथील सेवाभावी समाज सेवी कै. डॉ. मधुसूदन सिध्दनाथ काणे यांच्या प्रेरणेने हा कार्यक्रम याही वर्षी घेण्यात येते आहे. आरोग्य, व्यायाम व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा या कार्यक्रमात सहभाग राहील. सूर्यनमस्कार व व्यायाम, योग प्रेमींनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक मधुसिध्द बालकिशोर व्यायाम व प्राणायाम मंडळ श्री हनुमान आखाडा परिसर यांनी केले आहे.


epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


# संस्थाचालकाला अटक करण्यास पोलिस अपयशी

### ग्रामस्थ व पालक रस्त्यावर; दोन तास चक्का जाम

**लोकशाही वार्ता/उमरखेड**

तालुक्यातील दिवटपिंपरी येथील कु. महीमा आप्पाराव सरकाटे या मुलींचा स्कूलबसच्या अपघातात २५ जानेवारी रोजी मृत्यू झाला होता घटनेच्या तब्बल आठ दिवसानंतरही संस्था चालक दर्शन अग्रवाल आणि मुख्याध्यापक माधव कदम यांना अटक करण्यास पोलिस प्रशासन अपयशी ठरले आहे. ठाणेदाराने वीस तासाचा अवधी मागूनही वेळ मारून नेल्यामुळे १ फेब्रुवारी रोजी पालकांनी एकत्र येऊन पळशी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले.



संस्थाचालक दर्शन अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ केला. स्कूल बसचा पळशी फाट्याजवळील लिंबाच्या झाडाला धडक देऊन अपघात झाला त्यामध्ये कु . महिमाचा मृत्यू झाला तर वीस ते पंचवीस विद्यार्थी जखमी झाले या घटनेला जबाबदार संस्थाचालक चालक, मुख्याध्यापकासह संस्था चालक दर्शन अग्रवाल यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होवून आठ दिवस झाले तरी पोलीस प्रशासनाने इतर दोन जणांना अटक केली नाही. आरटीओच्या अहवालानुसार स्कूलबसचे कुठलेही वैद्य कागदपत्र उपलब्ध नव्हते वाहन विमा, फिटनेस प्रमाणपत्र, पियुसी , कर भरणा, आणि परमिटही संपलेले होते. पालकांनी व विद्यार्थ्यांनी वेळोवेळी दर्शन अग्रवाल यांना पालक सभेमध्ये तोंडी सूचना देऊनही त्यांनी कुठलीही दखल न घेतल्यामुळे हा भीषण अपघात झाला. सदर अपघातास फक्त संस्था संचालक जबाबदार आहे असा पालकांचा आरोप आहे. त्या निषेधार्थ पळशी फाटा येथे दि १ रोजी दुपारी १२ वाजता पालकांनी रास्ता रोको आंदोलन केले. पळशी फाटा येथे दोन तास झालेल्या आंदोलनामुळे रस्त्याच्या तीनही बाजूला वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलनामध्ये महिला पुरुष मोठ्या संख्येने सामील झाले होते. आंदोलकांनी रास्ता रोको करत प्रशासनास आपल्या मागण्या या ठिकाणी सादर केला यामध्ये प्रामुख्याने महिमा आप्पाराव सरकाटे या मुलीच्या कुटुंबाला न्याय दयावा व संस्थाचालक दर्शन अग्रवाल तात्काळ अटक करावी, स्टूडंट वेल्फेअर इंग्लिश मिडीअम स्कूलची मान्यता रद्द करावी, मृत महिमाच्या कुटंबाला संस्था चालकाकडून एक कोटी रुपये मदत द्यावी. तपास अधिकारी बदलून दयावा अशा मागण्या करीत भर उन्हात महिलांनी आक्रमता दाखविली जोपर्यत आरोपी दर्शन अग्रवाल यास अटक होत नाही तो पर्यंत आम्ही जाग्यावरून हालणार नाही असा दम पोलीस प्रशासणाला दिला. रास्ता रोको करण्यासाठी पिंपरी दिवट पोफाळी, कळमुला, पळशी, नागापूर,मुळावा, जनुना येथील हजारो ग्रामस्थ महिला पुरुष उपस्थीत होते. रास्ता रोको आंदोलणात शिवसेना ( शिंन्दे ) गट सामील होवून आरोपीस अटक करा म्हणून त्यांनी सुद्धा निवेदन दिले.

# समृद्धी सरस प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाकडे पहिल्याच दिवशी नागरिकांनी फिरवली पाठ

### निधी उपलब्ध असतांनाही प्रचार व प्रसाराकडे यंत्रणेचे दुर्लक्ष

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियानांतर्गत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व बचत गटाच्या माध्यमातून यवतमाळ येथे समता मैदान (पोस्टल ग्राऊंड) मध्ये दिनांक ०१ ते ०५ फेब्रुवारी दरम्यान समृध्दी सरस प्रदर्शन विक्रीचे आयोजन करण्यात आले. आज उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी या कार्यक्रमाकडे ग्रामीण भागासह स्थानिक नागरीकांनीही दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.



उद्घाटन कार्यक्रमाची वेळ होऊनही कार्यक्रमस्थ्ळी ५०-६० लोकही दिसून येत नव्हते. यामुळे आयोजक असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रनेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी निधी उपलब्ध असतांनाही प्रचार व प्रसार का केला नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बचतगटातील महिलांचा विकास व्हावा त्यांनी उत्पादित व निर्मित केलेल्या मालाला ग्राहक मिळावा, म्हणून अशा विक्री व प्रदर्शनाचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (उमेद)कडून अशा पध्दतीचे आयोजन केल्या जाते. या आयोजनासाठी शासनाकडून मुबलक निधीसुध्दा उपलब्ध करुन दिला जातो. मात्र काहींच्या खाऊ प्रवृत्तीने या प्रदर्शनाचा हेतू व उद्देश सर्वसामान्य नागरीक आणि बचतगटांच्या महिलांपर्यंत पोहोचतच नाही. परिणामी असे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम अयशस्वी होतात, असाच प्रकार आज उद्घाटनाच्या दिवशी पाहायला मिळाला. शासकीय यंत्रनेमार्फत बातम्या प्रकाशित करुन यशस्वी आयोजनाचा बागुलबुवा करीत निधी लाटला जातो हा निधी खरोखर या प्रदर्शन व विक्री कार्यक्रमासाठी खर्च करण्यात आला का, हा एक संशोधनाचा विषय आहे.

# युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

### नंद लॉजमध्ये घडली घटना

**लोकशाही वार्ता/उमरखेड**

स्थानीक बसस्थानका समोरील नंद लॉजमध्ये एका २५ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या घडल्याची घटना काल दिनांक ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता दरम्यान उघडकीस आली आहे .

पवन साहेबराव इंगळे (२५) असे मृतकाचे नाव असून तो नंद लॉज मध्ये मॅनेजर असलेल्या वडिला जवळ दुपार दरम्यान गेला होता. वडील साहेबराव यांना घरुन जेवणाचा डब्बा घेऊन या तो पर्यंत मी लॉज सांभाळतो असे त्याने सांगीतल्याने वडिलाने त्याला जेवणाचा डब्बा आणून दिला . त्याच दरम्यान रिकाम्या झालेल्या खोली नंबर २ मध्ये जेवण करतो व लॉज सांभाळतो म्हणून वडिलाला घरी पाठवीले . वडिल साहेबराव लॉजवर ४ वाजता दरम्यान पोहचले मात्र मुलगा पवन हा जेवण करून आराम करित असल्याचे समजून वडिलाने डिस्टर्ब केले नाही मात्र ५ वाजे पर्यंत त्याने दरवाजा उघडला नसल्याने वडिल साहेबरावने आवाज दिला परंतू काहि प्रतिसाद मिळत नसल्याने वडिलाने लॉज मालकाला सांगून दरवाजा तोडला असता पवन हा बेडसिटच्या साहाय्याने रुममधील पंख्याला गळफास घेतल्याचे दिसून आले . पूढील तपास उमरखेड ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात होत असून मृतक हा अविवाहित होता व कॅटरिंगचे काम करीत असतांना त्यांना आत्महत्या का केली? याचे कारण अद्यापही स्पष्ट झाले नाही .

# दूषित पाण्यामुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांचा जीव धोक्यात

### ग्रामपंचायत, कॉलेज व एमआयडीसीच्या ३ विहिरीत शिरतेय घाणपाणी; राष्ट्रीय महामार्ग ठेकेदाराने बुजवला लेंडी नाला, प्रशासन झोपेतच

**लोकशाही वार्ता/उमरखेड**

शहरातून गेलेल्या नागपूर तुळजापूर राष्ट्रीय एनएच -३६१ महामार्ग, हा ढाणकी मार्गावरील बायपास रोडवरील उड्डाणपुलाचे काम करतांना संबंधित कंत्राटदाराने, आंबवण तलावातून येणारा नाला बुजवला होता. या नाल्यावर ३ विहिरी असून, रूपाळा नागापूरच्या ग्रामपंचायतची सार्वजनिक विहिर, गावंडे कॉलेजची विहीर व एमआयडीसी ची विहीर, अशा तीन विहिरी असल्यामुळे यात घान व सडलेले दूषित पाणी शिरत आहे. यामुळे जवळपास हजारो लोकांच्या जीवावर बेतण्याचा प्रसंग निर्माण झाला असून, साथीचे आजार पसरण्याची भीती गावकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित यंत्रणेला बुजवलेला नाला खोदकाम करून सुरळीत करण्याचे तत्काळ आदेश द्यावे , अशा आशयाचे निवेदन रूपाळा नागापूर ग्रामपंचायतने उपविभागीय अधिकाऱ्यांना ८ जानेवारीला निवेदन दिले होते, मात्र अजून कार्यवाही झाली नसल्याने प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.



ढाणकी रोडवरील उमरखेड बायपास उड्डाण पुलाजवळील पूर्व बाजूने असलेला लेंडी नाला, महामार्ग प्राधिकरणाच्या कंत्राटदाराने बुजवून टाकला होता. या नाल्यामध्ये विरुद्ध बाजूने येणारे उमरखेड शहरातील सांडपाणी अगदी जवळ असलेल्या रुपाळा नागापूर ग्रामपंचायतच्या पाणी पुरवठ्याच्या सार्वजनिक विहिर, गावंडे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पाणी पुरवठा करणारी विहीर व एमआयडीसी ची विहीर अश्या एकूण तीन विहिरी आहेत. याच विहिरी भोवती घाण व सडलेले दूषित पाणी साचत आहे .सदर घाणपाणी विहिरीत झिरपत आहे. गावंडे कॉलेजच्या जवळपास ४ हजार विद्यार्थ्यांसहित, ३ हजार गावकऱ्यांच्या पिण्याचे पाणी दूषित होऊन, डायरिया, कॉलरा, टायफाईड असे साथीचे आजार पसरण्याची भीती गावकऱ्यांसहित गावंडे कॉलेज प्रशासनामध्ये निर्माण झाल्याने चंगलीच खळबळ उडाली आहे. ह्या प्रकरणी प्रशासनाने गंभीर दखल घेऊन महामार्ग प्राधिकरणाच्या कंत्राटदाराला बुजलेला नाला खोदकाम करून सुरळीत करण्याचा तत्काळ आदेश देण्यात यावा. अशा आशयाचे निवेदन रूपाळा नागापूर ग्रामपंचायतने, मागील ८ जानेवारीला उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना देण्यात आले आहे. मात्र या निवेदनाला २३ दिवस लोटूनही, प्रश्न निकाली निघाला नसल्याने प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.

# पिवरडोल येथे रस्ते, नालीचे काम केव्हा ?



**लोकशाही वार्ता/पाटणबोरी**

झरी जामणी तालुक्यातील पिवरडोल वार्ड क्रमांक ३ मधील ग्रामवासीयांनी प्रजासताकदिनी नाली रोड तयार करुन देण्याची मागणी केली आहे. मागील २० वर्षापासून नाली व रस्ता नसल्याने पावसाळ्याच्या दिवसात आजारी, डिलेव्हरी सारखे पेशंट यांचा सामना करावा लागतो. याच वार्डात अंगणवाडी असून लहान मुले व गरोदर स्त्रिया या रस्त्याने चिखलातून आपले जीवन काढत आले असून अनेकदा आमदार व ग्रामपंचायत यांना निवेदन देऊन सुद्धा या वार्डातील नाली रस्त्याची समस्या सुटत नाही. यासाठी २६ जानेवारी ला प्रजासताक दिनी ग्रामपंचायत सरपंच, सचिव यांना निवेदन देण्यात आले. यावेळी यादव ठाकरे, योगेश मोहुर्ले, अंकुश ठाकरे, अविनाश शेंडे, कंचन चौधरी, खुशाल ठाकरे,प्रफुल गावंडे, श्रीकांत गुरनुले, केशव ठाकरे, श्रेयश कोटरंगे, संतोष महाडोळे व इतर गावातील युवा वर्ग मोठ्या संख्येने या निवेदनात सहभागी होऊन गावातील समस्या मंडळी व वार्ड नंबर ३ साठीनाली रस्त्याच्या विषयी निवेदन दिले.

# दिग्दर्शक सलीम शेख यांची पेंडसे विद्यालयाला भेट

**लोकशाही वार्ता/ढाणकी**

शनिवारी, १ फेब्रुवारी २०२५ रोजी दिग्दर्शक, नाट्य निर्माता, लेखक, कलावंत सलीम शेख ह्यांनी सदिच्छा भेट दिली. ह्यावेळी विद्यालयाद्वारे मुख्याध्यापक श्री जैस्वाल सर व श्री पराते सरांनी सलीम शेख आणि त्यांच्या कुटुंबियांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.




सलीम शेख हे मूळ ढानकी ह्याच गावचे, परंतु १९९७ ला त्यांनी गाव सोडले व नागपूर येथे शिक्षणा साठी गेले.मुळात त्यांना नाट्यसृटीचे आकर्षण व अभिनयाची आवड असल्याने त्यांनी उच्च शिक्षण घेऊन सरकारी नोकऱ्यावर पाणी सोडून ते ह्या क्षेत्रात उतरले आणि आज त्यांच्या नावावर तीन मराठी चित्रपट, जवळ जवळ २३ नाटकं, ३ महानाट्य आणि बरेच लिखाण आहे. आज ते त्यांचे बालमित्र शिक्षक विजय पराते ह्यांना भेटायला म्हणून शाळेत आले होते.अशा प्रसंगी पराते सरांनी त्यांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देताताना बालपणीच्या अनेक आठवणीना उजाळा दिला. तसेच त्यांचे नाट्यसुटीतील योगदान, त्यांच्यातील कलावंत ह्यावर भरभरून बोलले. सलीम शेख ह्यांनी त्यांच्या जीवनातील संघर्ष तसेच त्यांनी केलेले कार्य, त्यांच्या आवडी , तसेच ग्राम पातळीवरील टॅलेंट कसे बाहेर आले पाहिजे हेही मांडले.जीवनात पैसा कुठपर्यंत असावा, जीवनात एखादी तरी आवड ,कला जपावी काही तरी वेगळे करून दाखवले पाहिजे असे ते विद्यार्थ्यांना संवाद साधताना बोलत होते. विद्यार्थी मोठ्या उल्हासाने व जिज्ञासेने त्यांचे बोलणे ऐकत होते. त्यांच्या सहचारिणी ह्यासुद्धा मंचावर उपस्थित होत्या. त्या सुद्धा उच्चविद्याविभूषित सात विषयात एम. ए.असून महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. शेवटी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक काइट सरांनी त्यांचे विद्यलयात मार्फत आभार मानले.

# सर्व घटकांना सामावून घेणारा अर्थसंकल्प -ना. संजय राठोड

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी सादर केलल्या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून मध्यमवर्गीय करदारत्यांना सुखद धक्का दिला. अशी प्रतिक्रिया राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली आहे.



नव्या कररचनेमुळे वार्षिक १२ लाख उत्पन्न असलेल्या करदात्यांचे उत्पन्न शंभर टक्के करमुक्त होणार आहे. शेतकरी, महिला यांनाही करमुक्त उत्पन्न मिळणार आहे. शेतकरी, महिला, युवक, कष्टकरी वगार्साठी विविध योजना या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आल्या. महिलांसाठी कौशल्याविकासाच्या योजनांवर भर दिला आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेत शेती उत्पादनात वाढ, शेतमाल साठवणूक क्षमता आणि सिंचन व क्रेडीट सुविधांवर अधिक भर देण्यात आल्याने शेती विकासासह ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे. किसान क्रेडीट कार्डची मयार्दा पाच लाख करण्यात आल्याने शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मयार्दा एक लाख रुपए करण्यात आल्याने ज्येष्ठांना आर्थिक बळ मिळणार आहे. विविध मोठ्या आजारांवरील ३६ औषधांवरील सीमाशुल्क माफ केल्याने ही औषधी स्वस्त दरात रूग्णांना मिळतील. ईलेक्ट्रीक वाहने, मोबाईल फोन स्वस्त होणार असल्याने त्याचा फायदा वाहन आणि माहिती तंत्रज्ञान उद्योगाला होईल. विविध वस्तू-सेवांवरील सात प्रकारचे शुल्क हटवविण्यात आल्याने या वस्तू व सेवा स्वस्त होतील, अशी प्रतिक्रिया मंत्री संजय राठोड यांनी दिली आहे.

## केंद्राच्या बजेटमध्ये शेती व शेतकरी बेदखल - माणिकराव ठाकरे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये शेतकरी सातत्याने दुर्लक्षित राहिला आहे. परंपरेप्रमाणे यंदाच्या बजेटमध्ये शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसली गेली. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कवडीमोल भावात आपला शेतमाल विकावा लागतो आहे. एमएसपीच्या दरानुसार भाव मिळत नाही. कृषीचे आयात-निर्यात धोरण शेतकऱ्यांसाठी कुठल्याही माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केला नाही. त्यामुळे केंद्रसरकारचे बजेट केवळ कृषी क्षेत्राला हुलकावणी देणारे असल्याचा प्रहार अखिल भारतीय काँग्रेसचे गोवा व दिवदमणचे पक्षप्रभारी माणिकराव ठाकरे यांनी केला. मुळात देशातील अर्थव्यवस्थाच शेतीवर अवलंबून आहे. मात्र आज देशातील शेतकरीच संकटात सापडला असतांना सवंग घोषणा करुन लोकांवर गारूड करण्याचा प्रकार सरकारने चालविला आहे.

## शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हिताचा विचार केला नाही - आ. मांगुळकर



केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकरी, कष्टकरी सर्वांच्या हिताचा विचार करण्यात आलेला नाही, अशी प्रतिक्रिया आ. बाळासाहेब मांगुळकर यांनी दिली. पायाभूत सुविधांसाठी कोणतीही तरतूद नाही. अर्थसंकल्पात उद्योग, बेरोजगारी, शेतकरी, युवक या सर्वांना बाजूला ठेवले आहे. अर्थसंकल्पात ठराविक वगार्लाच लाभ होईल. शेतकऱ्यांच्या दृष्टीने कोणतीही तरतूद नाही असे देखील आ. मांगुळकर यावेळी म्हणाले.

# अनाथ व वंचित बालकांची सफारी निघाली कृषी पर्यटनाला

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

जिल्ह्यातील अनाथ व वंचित असलेल्या बालगृहातील बालकांना एकत्रित करून त्यांना कृषी पर्यटनासाठी सहल म्हणून नेण्यात आले. यावेळी बालकांच्या चेहऱ्यावरील आनंद हा त्यांचा भूतकाळ विसरून टाकणारा होता. यवतमाळ जिल्ह्यातील पुसदपासून ते वणीपर्यंत अनेक बालगृह अनाथ व वंचित बेसहारा बालकांसाठी कार्यान्वित आहेत, या सर्व बालगृहातील बालकांना एकत्रित करून त्यांना कृषी पर्यटन सहल म्हणून ताईचा मळा पुलगाव या ठिकाणी यावर्षी नेण्यात आले.



जिल्ह्यातील अनाथ वंचित बालगुहातील बालकांना आपल्या आनंदातील आनंदात समाविष्ट करून घेण्यासाठी यवतमाळच्या काही सामाजिक जाण असलेल्या व्यक्तींकडून विविध उपक्रम आयोजित केल्या जातात याचाच एक भाग म्हणून दरवर्षी या बालकांना इतर बालकांच्या प्रमाणेच अनाथ व वंचित बालके सहलीपासून वंचित राहू नये म्हणून दरवर्षी सहलीचे आयोजन करण्यात येते, याचाच एक भाग म्हणून यावर्षी या बालकांना दिनांक ३१ जानेवारी रोजी ताईचा मळा या कृषी पर्यटन च्या ठिकाणी नेण्यात आले, यावेळी पुसद ते वनी पर्यंतचे सर्व बालकांना वाहना सह नेण्यात येऊन त्यांना तेथील सहासी खेळ, कृषी पर्यटन, स्विमिंग टँक, रेन डान्स, आउटडोअर व इनडोअर खेळ, उत्कृष्ट भोजन यासह अनेक बाबींचा आनंद देण्याचा प्रयत्न करण्यात आला, गेल्या तीन वषार्पासून या सर्व बालकांना दिवाळीनिमित्त दुकानात नेऊन त्यांच्या आवडी निवडीप्रमाणे नवीन कपडे घेऊन देण्याचाही प्रकल्प राबवीला जातो, यासह त्यांना लागणारे शैक्षणिक साहित्य, सायकली व आवशक्ते प्रमाणे इतर बाबीही पुरविण्याचा प्रयत्न केला जातो.

३१ जानेवारी रोजी बालकांच्या या कृषी पर्यटन सफारी ताईचा मळा या सहलीसाठी जाणाऱ्या वाहनाची पूजा करून हिरवी झेंडा सकाळी यवतमाळचे तहसीलदार योगेश देशमुख, देशमुख ताई, बालकल्याण समितीचे सदस्य अनिल गायकवाड, वनिता शिरफुले, लीना आदे, रवी गजभिये, देवेंद्र राजूरकर, जुमळे, अमित शिरभाते, स्वप्निल शेटे यांचे सह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

## श्री गणेश जयंती उत्साहात



**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

उमरसरा परिसरातील छत्रपती सोसायटीमध्ये आज गणपती विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी विलास धोटे व त्यांच्या सहचारीणी कुमूद धोटे यांनी गणपतीला अभिषेक करून आरती केली. यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष नितीन राणे, सचिव आनंद गावंडे, नारायण कोटरंगे, रमेश पेठे, सुरेश शेठे, दिनेश रुंदे, देशमुख मॅडम, शेटे मॅडम, नितीन जिकार, वैशाली जिकार आदी भाविक उपस्थित होते.

# नगरसेवकांचा पाच वर्ष सेवा समाप्तीनिमित्त सत्कार

**लोकशाही वार्ता/ढाणकी**

काँग्रेस कमेटी ढाणकीतर्फे काँग्रेस पक्ष्याच्या व मित्र पक्षाचा नगरसेवकाचा पाच वर्ष कार्यकाळ समाप्ती निमित्त सत्काराचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती मा सभापती बाळू पाटील चंद्रे प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव गायकवाड किशोर ठाकूर हामीद भाई आनंद पोपुलवार प्रवीण जैन ओमराव चंद्रे रमेश गायकवाड शिवाजी वैद्य होते.



नगरउपाध्यक्ष शेख जहीर जमीनदार नगरसेवक खाजा भाई कुरेशी नगरसेवक शंकर ताटीकुंडलवार नगरसेवक चंपत मिटकरे नगरसेवक शेख इरफान शेख मस्तान नगरसेवक संबोधी गायकवाड नगरसेवक रिजवाना परवीण नगरसेविका शायदाबी शेख मीरानजी नगरसेविका ज्योती ओमाराव चंद्रे नगरसेविका बसनूरबी शेख खलीद नगरसेविका शेवन्ताबाई गायकवाड नगरसेविका नूरजना बेगम शेख हुसेन या सर्व नगरसेवक नगरसेविकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित काँग्रेस व मित्र पक्ष्याच्या कार्यकत्यार्ला संबोधित करतांना बाळू पाटील चंद्रे यांनी ढाणकी नगरीतील मतदारांनी काँग्रेस पक्षावर जो विश्स्वास दाखवून तुम्हाला निवडून दिले त्यांचे कामे करण्यात तुम्ही कमी पडले नसाल पद कायम नसते जनतेची सेवा नेहमी करत राहावे काँग्रेस पक्ष नेहमी विकासात्मक कामे करण्यात पुढाकार घेतो त्यामध्ये श्रेय वाद आणत नाही आपल्या नगरीचा विकास कसे होईल याला प्राधान्य देतो असे मनोगत व्यक्त केले. यावेळी सुभाष गायकवाड जब्बज सर सुनील बुरसे शेख सतार अक्षय भगत राजू सावतकर अहेमद भाई कमिल भाई यासह इतरही कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काँग्रेस शहर अध्यक्ष आमोल तुपेकर तरसूत्रसंचालन माजी सैनिक तुळशीराम गायकवाड यांनी केले.